नाताळ २५ डिसेंबर २०२४

# कादोडी

तेरावा वहरी  एकून २० वॉ अंक

( खाजगी वितरण)



Design : Paul Dmello




- Established in 1967 by Dr. K. H. Gharda. Today Gharda Chemicals Limited is one of the top 3 Indian Crop Protection Chemical Manufacturers
- Gharda Chemicals Ltd also manufactures High Performance Polymers and Specialty Pigments
- Research driven company focussing on Technical Innovation, Energy Conservation, Product Development and Customer Satisfaction
- World's largest manufacturer of Chlorpyriphos Technical
- ISO 9001, ISO 14001, ISO 50001 and ISO 45001 Certified



**BASSEIN CATHOLIC CO-OPERATIVE BANK LTD**

ESTD. 1918

(SCHEDULED BANK)

"Celebrate the Joy of Giving with
Bassien Catholic Co-operative Bank
this Christmas Season!
Invest in moments that matter and
gift a prosperous future to your loved ones.

# Merry Christmas

And Happy New Year
filled with financial security, growth, and joy!"



**Board of Directors**

| Mr. Benauld Dias | Mr. Simon Soares | Mr. Sandeep Seth |
|---|---|---|
| Chaiman | Vice Chairman | CEO |

www.bccb.co.in

Helpline no. 080 6942 0000

Corporate Add. - Catholic Bank Building, Papdy naka, Vasai west 401 207

For more details visit our

# कादोडी

## नाताळश्या हनाओ विशेषांक

२५ डिसेंबर २०२४

तेरावा वहरी

विसावॉ अंक

खाजगी वितरन

## या अंकात .......


संपादकीय

मा मोडक्या तॉडक्या... – डॉ. नेहा सावंत

देवळाऑ दख्खॉ – फा. घोन्सालो डिसिल्वा

फॅमेली पेन्शन – फ्रान्सिस डिमेलो

आगरा -डॉंगराशो कान्यो – ऑल्विन परेरा

तिहरी शीटी – इनास तुस्कान

डसकाळ्ळॉ पानी तॅ - हेडविजेस रूमाव

लाद्रू पेद्रु – सिरील मिनेझिस

लाडकी बेन – शकुंतला नारायण पाटील

उठवॅ नाय – आब्राहाम तुस्कानो

लेकीआ प्रेम – बबन रॉड्रिग्ज

पय आन पेनल – विलास मेदोडीकर

गाव – घराला घरपान - आलेस डाबरे


**संपर्क / अभिप्राय :-** आमश्या हरी संपर्क कऱ्याकरतान नातॅ आपला या अंकाविषयीसा मत, संपादक मंडळाश्या कुनालाही भॅटॉन जरूर कळवा.


**संपादक**

ख्रिस्तोफर रिबेलो (९८१९४३६०७८)

**सहसंपादक**

एडवर्ड डिसोजा

**सहसंपादक**

**संपादक मंडळ**

सुनील बा. डिमेलो, सायमन रॉड्रिग्ज, तेरेजा डिसोजा, जेम्सन डिमेलो, डॅनियल मस्करणीस, रॉबर्ट फर्नांडिस, राजन डिमेलो, रॉबिन्सन डिमेलो, वॉल्टर तुस्कानो, सिरील मिनेझीस

**मुखपृष्ठ :-** पॉल डिमेलो, गास

**Email :-** kadodivasai@gmail.com

**Web :- www.kadodi.in**



या अंकात प्रसिद्ध जालॅल्या मताशी संपादक मंडळ सहमत हायदॅस आहा नाय.


जकलॅ जाहिरातदार, देनगीदार तहॅस बरा-वाईट मत देनाऱ्या जकल्या कुपारी लॉकांअॅ आमॅ खूप आभार मानत्याव.
**नाताळसॉ हन सब्बान कुपाऱ्यांना खुब आनंदाव आन मजॅऑ जाओ अह्यो शुभेच्छा.**

**सूचना:-** ‘कादोडी’ या अंकात तुमाला लेख, कविता आहा कय द्यासा हायदॅ तॅ **kadodivasai@gmail.com** याओरती धाडा नातॅ संपादक मंडळाला भेटा.

# जीवन विकास नागरी सहकारी पतपेढी (मर्यादित), वाघोली.

रजि.नं.टीएनए /व्हीएस्आय /आरएस्आर / सीआर / ४२९ / ८८-८९ दिनांक ९-१२-१९८८

## *कोकण विभागातील अग्रेसर पतपेढी*

**आपल्या व्यावसायीक व कौटुंबिक विकास योजनेसाठी पतपेढीच्या सेवा**

*१३ महिन्यापेक्षा जास्त ते १८ महिन्यापर्यंत*

**जीवन विकास दिर्घ मुदत ठेव योजना ७.६० % (सरळव्याज)**

ज्येष्ठ नागरीकांच्या ठेवीवर - द.सा.द.शे. **७.५५%** व्याजदर

**सर्वसाधारण सभासदांस द.सा.द.शे. ७.३० % व्याजदर**

८.५०% ते ११.७५% व्याजदराच्या विविध सुलभ कर्ज योजना.

**शैक्षणिक कर्ज किफायतशीर व्याजदरात - ८.९५%**

**घरबांधणी कर्ज द.सा.द.शे. ९% व्याजदर**

**फ्लॅट खरेदी द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर**

**सोलार पॅनल कर्ज द.सा.द.शे. ८.५०% व्याजदर**

**शॉप, गाळे, मशिनरी खरेदीसाठी द.सा.द.शे. ९.५०% व्याजदर**

**(१ कोटीपर्यंत कर्ज वितरण करणारी एकमेव पतसंस्था)**

**रू. ५ लक्ष पतकर्जाचे त्वरीत वितरण**

**नियमित कर्ज भरणा करणा-यांना व्याजात २% रिबेट**

**३१ ऑक्टोबर २०२४ अखेर आर्थिक प्रगतीचे बोलके आकडे**

- भागभांडवल रू. १४.०५ कोटी
- कर्जे रू. २२१.५९ कोटी
- ठेवी रू. ३७७.८३ कोटी
- गुंतवणूक रू. २३९.२८ कोटी
- एकूण व्यवसाय रू. ५९९.४२ कोटी
- सभासद संख्या १७३५८
- निव्वळ एन. पी. ए. ०%
- दि. ३१/०३/२०२४ अखेर नफा रू. ६.७१ कोटी

**शाखा -**

| निर्मळ | सत्पाळा | उमराळे | नानभाट | आगाशी | नालासोपारा (प.) |
|---|---|---|---|---|---|
| फोन :८००७९५५४३० | मो. ७२६१९१९०१२ | मो. ०८५५०९१०२६४ | मो. ७२६१९१९०१३ | मो. ०८५५०९१०६४३ | मो. ७८७५८९५५०८ |

**लता जे.फोस** — मुख्य कार्यकारी अधिकारी

**संज्याव जे.रोझारियो** — उपाध्यक्ष

**नेल्सन पी. दोडती** — अध्यक्ष

**व संचालक मंडळ**

JEEVAN VIKAS SAHAKARI PATPEDHI LTD. Reg. No. T.N.A./V.S.I./R.S.R./C.R./429/88-89 Dt. 9-12-1988 WAGHOLI

# संपादकीय

सब्बान कुपारी बाहा-बेनींना नाताळश्या हनायो आन नव्या वहारायो ओबड्यो शुभेच्छा.

मंडळी, या वहरा २५ जुलैश्या दिहा आपल्या जकल्याव लाडकॉ फादर फ्रान्सिस दिब्रिटो (तात्या फादर) आपल्यातनॅ निंगॉन गेले. फा. दिब्रिटोनॅ आपल्या अंकाकरता नेहमी बॅस दिलास पन यॉ अंक 'एक दस्ताऐवज' हाय, तुमॅ त्याआ प्रकाशन सालू ठॉवा आहा त्यायी आमाला हांगिलॅ. त्यांशी यी इच्छा आमॅ नक्कीस पुरी करनार. गॅल्या वहरा नाताळश्या हनाआ फक्त पास दी अगोदर एक दू:खायी बातमी आली, ती मंजॅ, आपल्या समाजाव पयलॉ गायक, विजय मच्याडो आपल्याला हॉडॉन गॅलॉ. स्व. फा. दिब्रिटो आन स्व. विजा दा आ जान्यानॅ आपल्या समाजाआ साहित्यिक आन संगीत क्षेत्राऑ कॉपरॉ रिकामी जालॉ. त्या दॉगांना 'कादोडी' आन 'कुपारी कट्टा' टिमश्या दरनॅ श्रद्धांजली.

मंडळी,  नाताळ २०१६ श्या कादोडी संपादकीयामिनॅ मॅ फा. दिब्रिटो मराठी साहित्य संमेलनाऑ अध्यक्ष जालॉ पाय आहा लीविलता, ता स्वप्न सप्टेंबर २०१९ ला पुर्न जाला. आपल्या कुपारी समाजाशॅ पोरे / माहने कलाक्रिडा क्षेत्रात चमक्या लागल्यात, गेल्या वहरा संपादकीयामिनॅ मॅ आपल्या समाजात समाजाला पुडॅ घॅवॉन जायदॅ आहा राजकीय नेतृत्व नाय आहा लीविलता. त्यानंतर आमश्या 'कुपारी कट्ट्या' ग्रुपमिनॅ मॅ हांग्यासॉ, आपल्या समाजायी बरी प्रगती सलले, तॅ आपलॉ कुपारी आमदार हॉया पाय, आपलॉ कुन पॉर रणजी / भारताआ टिम करता खेळ्या पाय, कला क्षेत्रात चमक्या पाय. मंडळी, आपल्या गाहासॉ पॉल डिमेलो यांसा आपल्या संस्कृतीओर आधारित चित्रकला प्रदर्शन प्रतिष्ठित जहांगीर आर्ट गॅलरीत गॅल्यास मयन्यात जाला, पॉल गेली ८-१० वहरे आपल्या या अंकाकरता मुखपृष्ट बनवॉन देतॅ, ता पन कय न घेता, त्याला हांगीला गा, त्याआ नेहमी एकुस वाक्य, तुमॅ आपल्या समाजाकरता ऑडा करत्या, त्यात माऑ खारीऑ वाटॉ, त्याआ खास अबिंनंदन. शिरलयवाडीशे फिलिप डिमेलो सर यांशे चित्रे पन खुब प्रसिद्ध जाल्यात आन ते यात बुजुर्ग हात. आपलॅ इतर बंदव आन बेन्यो पन बऱ्यापैकी चमकाल्यात. आपल्या आडे एकदी या जकल्यांसा एक प्रदर्शन हॉया पाय अही इच्छा हाय.

मंडळी, आपलॉ कुपारी आमदार कतॅ हॉयॅ माईत नाय पान राजन नाईक आपल्या बाजूश्या सामवेदी समाजाव आपली भाषा बॉलनारॉ स्थानिक आमदार जालॉ, आपले पोरे क्रिकेटमिनॅ पुडॅ जादो पान सुरुवात जाले. झील डिमेलो यी पोरी मुंबई महिला टिममिनॅ खॅळातॅ आन आयुष म्हात्रे यॉ आपलॉ सामवेदी बंदव रणजी खॅळतॉ हाय आन अन्डर-१९ भारताआ टिममिनॅ पान खॅळलॉ. शिरलयवाडीसॉ पॉर, इयान लोपीस खेलो इंडिया बॅडमिंटन स्पर्धेमिनॅ खेळनार हाय. त्यामुळॅ आपुन कडॅस मागॅ रॅनार नाय यायी शाश्वती हाय.

मंडळी, दर वहरा आपुन कुहन्या तरी गोष्टीओर विसार कऱ्या करता आडॅ विषय घॅत्याव. या वहरा आपुन लग्नाआ कार्यक्रमाओर ध्यान द्या पाय आहा आमाला वाटातॅ, गुरवारपासून लागला तॅ पुडश्या आठवड्याआ मंगळवारपोत आपलॉ कार्यक्रम सुरू आहातॅ. नक्की ऑड्या सेलिब्रेशनशी गरज हाय गा. या कार्यक्रमात हॉनारी सयपाकाइ नासाडी, प्री-वेडिंग रिसप्शनमुळॅ सुकनारॉ अंदाज, त्यामुळॅ हॉनारॉ पैशाऑ नास. यावर आपुन जरा कडाक नंदार टाक्या पाय.

कादोडी अंकातनॅ आपली भाशा जगवॅकरता प्रयत्न करतॅवुस पन दरवाहरा आपल्या समाजॅआ भलॅकरता एक बरॉ विसार पन देतॅव. एक कुपारी समाज भगून आपुन जकले सोबत रॅवॉन पुडॅ जाऑ.

बाकी आपल्या समाजायी अहीस चांगली प्रगती हॉत रेवो आन आपली संस्कृती टिकॉन रेवो...

# मा मॉडक्या तॉडक्या कादोडीसॉ मॉडकॉ

▪ डॉ. नेहा सावंत, दहिसर मुंबई.

कादोडी भाषेया आकर्षनापायी मॅ २०१४ मिनॅ मा संशोधना संकलनाश्या कामाला सुरुवात केली. रीतसर २०१७ मिनॅ मुंबई विद्यापीठामिनॅ PhD करता नोंदणी केली. जकला काम २०२२ मिनॅ खपला, आन मला डॉक्टरेट इ पदवी मिळाली. पन खरा हांग्यासा तॅ मा समाधान कय जाला नाय, कादो? गालिबनॅ जहा प्रेमाआ अथांगपणा आन  गहनपना दाखड्यादो हांगिलॅ गा, "ये आग का दरिया है बस डूबते जाना है" तहीस माई अवस्था झाले. "ये कादोडी का दरिया है, बस डूबते जाना है, या गोते खाना है". पांस स वहरे ऑडा अब्यास करॉन पान आहा वाटातॅ की माकून श्रीगणेशा कऱ्या पाय.

नमनाला घडाभर तॅल कादो? का जाला ता हांगातॅ. माआ एका पुस्तकादो मॅ कादोडी मिन्श्या ललित लेखांआ संकलन करतोती, त्यामिनॅ क्लेमेंट डिमेलोसॉ  'केळ' नावासॉ मस्त लेख वाशीलॉ. जाम भारी लिवितॅ क्लेमेंट. तॅ त्यातश्या 'केळ' या ललित लेखामिनॅ केळीआ बुडोर हींग्यो आलत्यॉ. अहॉ उल्लेख आलतॉ. माला फक्त हेगटायो हींगो माहीत होत्यो. त्या केळीश्या बुडोर हींग्यो कह्यॉ येद्यात अहॉ  विसार माआ मनामिनॅ आलॉ. मंग डिमेलो सरनॅ मला हांगीला की, "केळीच्या बुंध्याशी जी केळीची बाळरूपं असतात, त्यांना हिंग्यो म्हणतात." जहा मराठी मिनॅ घोड्याआ किंवा पाळीव प्राण्याआ  वाहराला शिंगरू बोलात्याव तहास केळीआ बाळरुपाला शिंग्यो मिंजॅस हिंग्यो. शार वहारात ऑ शब्द माला माइत नॉतॉ, तॉ आतॅ माइत पडलॉ.

आतॅ या लेखा शीर्षकूस बगा गनी, आमी मराठी मिनॅ मोडकॉ बोयले तॅ त्याव अर्थ 'तुटका, फुटका, मोडलेला' अहॉ हॉतॅ. पान कादोडीमिनॅ 'मोडकॉ' मिनजॅ मराठीसॉ 'घास' मिनजॅस हिंदीसॉ 'निवाला' ('निवाला' मिनजॅ कादोडीमिनॅ थंडा जाला!)  अही गंमत होयदॅ. कतॅ कतॅ मला समजॅ नाय 'आह्यादो बाहालो' मिंजॅ  'हसायला विसरला' की 'अशाला बसला?' कोडयॉ गमती जमती या भार्शॅमिनॅ ! माऑ नेहमीस गोंधळ हॉतॅ 'बघून, बगून, भगून' यासॉ कुहनॉ शब्द कतॅ वापऱ्यासॉ? कतॅ कुनाला शुबेच्छा देताना हनायो बोल्यासा गा हनाशा, हनाव गा हना शुबेच्चा नक्की का वापऱ्यासा? मराठी मिनॅ प्रथम पुरुषी एकवचनी शब्द ' मी' अहॉस वापरत्यात पन कादोडी मिनॅ काईक माहणे मॅ, म्यें, म्य, मे अहे शब्द योजतात, या मिन्सॉ  नक्की कुहनॉ शब्द निवड्यासॉ?

माई जाम पंचाईत हॉतॅ जिगाळा निहण, निहाण, तळा, तळ्योर, बार, अहें कित्येक शब्द, ज्यांना एकापेक्षा अनेक अर्थच्छटा अहात्यात. पन एक नक्कीस कबूल कऱ्या पाय जॅ गा, कादोडी

भाषेमिनॅ एकेका वस्तुश्या अवस्थेपरमानॅ त्याए नावे बदलात्यात, भगुन शब्दसंपत्ती घनी हॉत जातॅ. जहा की केळीआ पाना अवस्थेपरमानॅ पोंगी, खोलॉ, आंगाठ अहे नावे कोडे अर्थपूर्न हात तोडे इतर भाषामिनॅ कडे हायत ? आतॅ वारमोड कोडॉ अर्थसघन शब्द कादोडीत दिखातॅ, पन आहॉ शब्द किंवा या शब्दादो मराठीमिनॅ शब्दस हापडे नाय. आपुन मराठी मीनॅ वादळ बोलात्याव पान अर्थाशी जी मजा, जॉ अनुभव वारमोड मीनॅ व्यक्त हॉतॅ तॉ वादळ मिनॅ दिखे नाय.

आतॅ मॅ एक गंमत हांगतॅ. एक दि मॅ 'बाळटीम' बद्दल वाशीतोती. त्यामिनॅ मदरीन, पदरीनला 'तात्याव पॉळो' ऑहॉ उल्लेख आलतॉ, तॅ मॅ विसारात पडली, ओ तात्या मिनशामिनॅ कडनॅ आलो? त्याला पॉळो' कादो द्यासॉ? अह्या जाम गमती जमतीतनॅ मॅ अद्याप हिकातॅ, तरी पन माला आहा वाटातॅ की, माला अद्याप कोडातरी हिक्यासा हाय.

सध्या कादोडी भाषेमिनश्या कथांवर एक पुस्तक प्रकाशित कऱ्याशी माइ खटपाट सालू हाय. यो कथा कुपारेतर माहनांना पन समजाल्यॉ पात भगून मॅ मराठीमिनॅ अनुवाद कऱ्यादो सुरुवात केली. माला वाटला, जाम सॉप्पा काम हाय. पण तडॅ बी पंचाईत, कारन मराठीमिनॅ जरा घनॅस आदरार्थी शब्द वापरत्यात. "ते फादर" आहा बोलतात, पण कादोडीमिनॅ प्रेमापायी "तॉ फादर" आहा बोल्याशी पद्धत हाय. या पर्मान मॅ अनुवाद केलॉ तॅ तॉ सुकीऑ वाटॅदॅ. बरा, कुनापा तपाशादो दिला तॅ त्यांना वाटायसा, नेहाबायला ऑडा पन जमॅ नाय ! ऑडॉ सुकीऑ अन् बॅक्कार अनुवाद करतॅ तॅ इआ मराठी पन् बॅक्कार हायदॅ. माला जाम धास्ती वाट्याशी. त्यामिनॅ पान इनास तुस्कानसॉ लेख , कथा अनुवाद मिंजे मा बोठ्ठी परीक्षा. कादो? एकदम पिव्वर कुपारीश्या म्हणी, कतॅ कतॅ मा भेजा आऊट होयासा. कारन माला त्याव जहॉ लाग्यासा त्यापेक्षा भलतॉस अर्थ निंग्यासॉ. मिन्जे एका भाषेतनॅ दुहऱ्या भाशॅमिनॅ अनुवाद करताना नुसतॉ शब्दांऑ अनुवाद करॉन भागॅ नाय तर त्या भाषेसा व्याकरण, परतेक शब्दाइ अर्थच्छटा, त्या भाषेइ संस्कृती या जकल्याऑ विसार कऱ्या लागॅदॅ.

कादोडी भाषेमिनॅ म्हणींऑ अक्षरशः खानी हात. दर आठ-दा दिहामिनॅ कोडयॉतरी जुन्यॉ जुन्यॉ म्हणी आमश्या सामवेदी शब्दसूची या व्हॉट्सॲप ग्रुप मिनॅ टाकित्यात (त्योर आतॅ स्वतंत्र काम जाला पाय आहा माला मनापासून वाटातॅ.)

गेल्या वहरा कादोडी अंकामिनॅ मॅ मा पिएशडीशी कानी लिविलती, तिगाळा वाटलोता गा मला आता ई कादोडी हुमजा लागली. पन आतॅ वाटातॅ की माऑ आख्खॉ जल्म खपॅदॅ तिगाळा मा हाता जुरुक्सा कयतरी लागॅदॅ. लिगरी लिगरी शब्दांय मा तळा भरदॅ. कारन ये कादोडी का दरिया है! बस डुबते जाना है बस् !

(विशेष आभार – सॅबी परेरा)

# देवळाऑ दख्खॉ

- **फा. घोन्सालो डिसिल्वा, (OFM कॅप्यु) गास (वानत)**

बंगलोरश्या डॉन बॉस्कोआ संस्थेत नव मयनॅऑ 'युथ कौन्सिलिंगसॉ' डिप्लोमा करॉन फा. जॉन संत मार्कशा पॅरिश मीनॅ गॅल्या जुन मयन्यापासून लानॉ फादर बगुन आल्तॉ. बॉठ्ठॉ फादर अंतोन तडे अगोदरूस पास वहरापासून पॅरिशप्रिस्ट बगुन काम बगीतोतॉ.

तॅ दोगी पॅरिशमिनश्या लॉकांआ आध्यात्मिक परगती करतान जीव ऑटॉन काम करतॉतॅ. हाकाळ-हांज मिशे बॉलॅशे, गावात जाऑन जकल्यांआ घारा भेठी द्याशे, शाळा सालव्याशे. परतेक हिन्वारॅ बारक्या पॉरांकरतना दोथ्रिनशी जिमेदारी पन हांबळ्याशे.

एक दी दॉपारश्या जीवनोर बॉठॉ फा. अंतोन बोयलॉ, 'फा. जॉन, तुमी युथ कौन्सलिंगसॉ डिप्लॉमा करॉन आल्या इ बो कवतीकाइ गोस्ट हाय. तुमाला तॅआ कोर्समीनॅ तरुनांना काहा मार्गदर्शन करेसा, त्यांयो अडसनी कहयो हुमजॉन घ्याश्यो याबद्दल खास माइती दिलेस हायदॅ. मॅ या पॅरिशमीनॅ गेले पास वहरे पॅरिशप्रिस्ट बगुन काम करतॅ. जक्ला कय अडे बरा हाय. बरेस लोक देवळा येत्यात, कशीनीत बऱ्यापैकी दान पन टाकीतॅत. आपल्या देवळा कय काम काडला गा उदार आथॅ मदत पन करतॅत. आपले जक्ले लोक खाऑन-पॅऑन सुकी हाथ. परतेक गावापरिवारात लान्यापासून बॉठॅपोत जक्ले रातबेरात ॲकमॅकांआ अडीअडसनीला दाव्हॉन जातॅत.

इ जक्ला कय ठीक हाय, पन जॉहॉ सांदोर काळॉ दाग आहातॅ, गुलाबाआ फुलाला काटॅ आहातॅत, तही आपल्या या पॅरिशमीनॅ एक बोठी कीड हाय. रातून्दी एकुस गोस्ट माला खटकातॅ ती मिंजॅ आपली तरुन मंडळी. बऱ्यास वॅळॅला कय बुजुर्ग लोकांइ माला हांगीला की देवळात मिस सुरू असताना बरेस तरुन आपल्या दॅवळाआ बारश्या दख्ख्योर बॅहॉन गप्पा-गोस्टी करतॅत. कून मोबाइलवर बॉलातॅत, कून युट्यूबवर गानॅ आयकातॅत, तॅ कून सड्क्योरनॅ साल्ला तॅइ टिंगल करतॅत. माला बरा नाय वाटॅ. कारन की अडे देवळात मिस सलातॅ आन तडे दॅवळा दख्ख्योर यांऑ नाय नाय तॅ उदयेग सलातॅत. आपलॅआ पॅरिशमीनॅ ल्ग्ना- मोर्तादो आन हनावारादो कतॅ कतॅ मॅरदॅरशा पॅरिशशे लोक येतॅत तॅंना का वाटातॅ हायदॅ.?

मॅ माआ परिन आपलॅआ तरुनांना समजाऑन हांगीला, पन माआ बॉलना कुनुस कानोर गॅथ नाय. कय वक्ता मॅ त्योंर रागावलॉ, बडखालॉ सुदा, मिसोर तावातावानॅ बोयलॉ

पन कय वॅळा वळाली नाय. उल्टा तरुन जास्तीस उरफाटे वागॅआ लागले. बॉलातॅत ना 'उंदराव जीव जातॅ आन मांदर मजा बगीतॅ'. आतॅ वयमानापरमानॅ माई पन आजकाल जरा घनिस शिडशिड हॉथॅ. माआ जीवाइ नुसती आकळ हॉथॅ. हाकाळ-हांज माला दोन-दोन प्रेशरश्यो गोळयो घ्या लागातॅत. परवा डॉक्टरनॅ रगात तपाशीला. माला बोयलॉ, 'फादर, जरा हांबळा हा ! तुमशी शुगर सद्या बॉर्डर लाइनवर हाय.' माला कय सुशॅ नाय. का करॅसा ता. 'बगा तुमश्या बळॅ कय ऑहॅदॅ तॅ, आपलॅआ पॅरिशसॉ आश्रयदातॉ संत मार्क आपलॅला पावॅदॅ आहा कय तरी करा.'

दॅवळाआ मॅस्तानॅ टेबलोर तळॉन ठोयलॅलॉ शिकनसॉ लेग्पीस खादो टुकीत फा. जॉन बोयलॉ, 'फा. अंतोन, माइ बय माला सदा हांगॅशी, पॉरा, आऊक्षात अहे कामे करॅशे की हरपु मॅलॉ पाय आन आथशी दांडी पन मोडली पा नाय.' 'हुंटीबगार खॉकलॉ गॅलॉ पाय.' मॅ बगीतॅ मा बळॅ जॉडा कय करता येदॅ तॉडा करनॅस. आपलॅला तरुन पॉरांपांरोर शीडॉन अजिबात सलॅसा नाय. वॅंगॅत गॅऑन ठॉसॉ मारॉन पन जमॅसा नाय. तॅना जकल्याना मयॅन समजॉन – उमजॉन हांगॅआ लागॅदॅ. तुमी आतॅ ती जक्लि जीमेदारी माओर हॉडा आन बिंदास रॅआ. फक्त माला थॉडॉ वखत द्या.'

जाला. तॅआ दिहापासून जीगाळा-जीगाळा फा. अंतोन मिसा करॅसॉ तिगाळा फा. जॉन दॅवळाबारनॅ नुसतीस एक फेरी मारॅसॉ. तरुन पोरे द्ख्ख्योर बॅहॉन आवाज गोंदळ करॅशे. फादर त्योंर नुसतॉस बगॉन गालाश्या गालात हावॅसॉ. तॅना कय बॉलॅसॉ नाय. पॉरांना वाटॅसा गा बव्तेक लानॉ फादर आपलॅला टरकातॅ. पॉँरांआ टॉळका मनातशा मनात खुश हॉॲसा. आन तॅँना दऱ्या पान्या घतीन उदान यासा.

दिहान मांगॅ दी भरातोतॅ. अहॅस तीनशार मयनॅ भरलॅ. एक दी आयत्वार हाकोटे लग्नाआ मिसा सल्लॉता. तॅआ मिसाला मॅरदॅरश्या दोनशार पॅरिशशे लोक हयरे-हुयरे आल्ते. वर बारशॅ पास-स फादरू आल्तॅ. बॉठॉ फादर आन बीॲ बारशॅ फादर आल्तारोर हॉथॅ. फा. जॉननॅ नेहमीपरमानॅ एक फेरी मारली. पॉरांऑ नेहमीसॉ तमाशॉ सुरूस हॉथॉ. फादर तॅँआ पुडॅ गढीबर ऊबी रॅलॉ मंग तॅँना बोयलॉ, 'पॉरांदो ! मॅ तुमाला कळकळीनॅ हांगातॅ, एक फादर भगून माआ तुमश्योर पिरेम हाय भगून बोलातॅ. तुमे एक तॅ आपल्या दॅवळा दख्ख्या ॲंगा बॅहा नातॅ तॅँगा बॅहा, पन दख्ख्योर बॅहॉ नाका. दख्ख्योर बॅहना वाईट आहातॅ.

ऑडॅत तॅतसा एक उनाड पॉर बाडका घतीन उडी मारॉन दख्ख्योरनॅ खाला उतारलॉ. फादरशा समोर ॲऑन मिजास करीत बोयलॉ, 'फादर ! आमे कडे बॅहॅसा कडे नाय ता तुमे हांगॉ नाका. तुमे आमश्या पॅरिशमीनॅ आलॅला स मयनॅ पन भरलॅ नात. तुमे याश्या आदी पन आमे अडेस बॅहॅशे. आजपोत बॉठ्या फादरनॅ आमाला खुब वॅळा हांगीला पन आमे तॅआ

नाय आयकीला. तॅ तुमे कून आमाला बॉलनार ? तुमे कय आमाला 'संडे स्कूलशे टारेटुरे समजात्या गा का.? तुमे तुमशे कामे करा. आमशा नादी लागॉ नाका नातॅ तुमाला जड जायदॅ. आमे कय तुमाला हांग्या येत्याव, 'गा मिसा आहा करा, शरमाव अहो अहो द्या' नाय ना मंग. आमसॉ नाद नाय करॅसॉ. आमसा आहा हाय, 'आला आंगोर गा गॅठ्ला हिंगोर.'

आमशा मीनॅ कूनॅ आय टी तॅ कुनॅ बी टेक कॅलॅ, कुन एमबीए जालॅ, कैकाइ मास्टर पन कॅलॅ. आमश्या बय-बाबानॅ ढॉसॉन – ढॉसॉन घरने देवळा धाडलॅ तॅ निदान आमे आलॅव तरी.' ॲकानॅ आहा बॉलता खोटी बीॲ दाताॲ फनॅ काडॉन आह्या लागलॅ. फादरनॅ तॅआ जकल्योर बगीला, मिंगॅ तॅआ पॉरा पाठीओरनॅ बॉठ्या मयेनॅ आथ फिरवॉन बोयलॉ, 'नाय रॅ बाबा मॅ तुमाला संडेस्कूल शे पोरे नाय समजॅ. तूमॅ जक्ले हिकलेले पोरे. तूमॅ आपल्या समाजाॲ-दॅशाय हाकाळशॉ जीमेदार नागरिक हा. तॅआस बरबर देऊळमातेशे सदस्य हा. मॅ तुमशी कदर करतॅ. कय वहरान तुम्शे लग्ने जालॅ मंग तुमे जीमेदार पालक हॉनार हा. ये आपले लाने संडेस्कूल शे टारके-टुरके पोरे आज तुमाला आहा दख्ख्योर बेहॅलॅलॅ बगीतॅत. हाकाळ ते बोठ्ठे जाले गा ते पन अहेस तुमश्या हांगडे अडे देवळा दख्ख्योर बॅहॅद्यात. मॅ तुमाला माॲ बाव्हंडे समजातॅ. का हाय पॉरांदो मईत हाय गा,'जे दख्ख्योर बॅहातॅत ना ते आयुक्षात दख्ख्यालास लागातॅत.

तुमसापकी कून दख्ख्याला लागलॉ पा नाय आहा माला वाटातॅ, भगून मॅ बोयलॉ.'

'हां.. हां.. बराय.. तुमाला का हांगॅसा ऑथा ता हांगॉन जाला. तुमसा बॉल्ना आमे ॲका कानाय आयकीला आन बीआ कानाय होडला तॅ तुमे आमसा का करनार ? पॉर बोयलॉ. 'मॅ तुमसा का करनार. पन तॉ आपलॉ सॉर्गातसॉ बाप देव हाय ना तॉ आप्ल्योर ऑबडा पीरेम करतॅ, तॅआबनी तॅनॅ आपलॉ पूत आपलॅला दिलॉ. जॉ खुरसोर मॅलॉ. आपलॅआ आत्म्याला लागलॅलॉ पापाऑ दाग तॅआ पुताआ रगताॲ धोयलॉ. बाबांनॉ माला नाका ब्येव पन तॅआ सॉर्गातश्या दॅवाला घाबरा. मॅ का, आज अडे हाय हाकाळ बदली जाली गा बीआ जागी साल्लॉ. पन तुमे अडेस रॅशे. तुमसा आयुक्ष अडेस जासा हाय.' फादरसा बॉल्ना आयकॉन पॉरांना लाज वाटली. तॅना तॅइ सुक कळली. जक्ले बोयले, 'सॉरी... सॉरी फादर. आमशी सुक जाली. आमाला माफ करा फादर.' ऑडा बॉलॉन जक्ले पोरे देवळाआ दख्ख्योरनॅ बावखालातश्या बाडकांगत ॲकमॅकां मांगी टनाटन उडयो मारीत खाला उतारलॅ आन अल्लामत देवळात खीरलॅ.

तॅआ दिहापासून कुनुस दख्ख्योर दिख्याशे रेले. जक्ले तरुन मिसाला देवळात हारकॅ-हुरकॅ बॅहादो लागलॅ. आतॅ अदनॅ मदनॅ दख्ख्योर ॲखाद कागूळॉ नातॅ बगळॉ मात्र दिख्यासॉ.

# फॅमेली पेन्शन

**▪ फ्रान्सिस डिमेलो, दोनतलाव**

‘खप खप खपलॉ आन मातीआ पुंज्योर बॅहॅलॉ. का कमायला ? तिगाळा शाळा होडली नसती तॅ आज दोन पैशॅ पेन्शन खाओता गा नाय.’ शिजूऑ ऑ लाहा सालुला कय नवॉ नॉतॉ. आयकॉन आयकॉन सालुअॅ कान किटलोतॅ. तॉ अॅका कानाय आयकॅसॉ आन बीआ कानाय हॉडॉन दॅसॉ.

पन खरा हांगॅसा तॅ शिजूआ बॉलनॅला कय सार नॉतॉ आहा नाय. सालु, शिमू आन कतीऑ जकल्यात बॉठॉ पॉर. शिमू आन कतीला पास-स वहरोर जालॅलॉ बाबू मिंजॅस सालु. शिमूऑ तिगाळा सलतॉ वखत हॉतॉ. गॉठॅत आठ-दा भई. दुदाऑ पास. तीन-शारशे केळीऑ दंदॉ आन वहरीभर पुरदॅ ऑडा भात हॉतॅ. कळंग्यात दानॉ हॉतॉ आन हाता नानॉ हॉतॉ. गावकॉठारीत हयऱ्या पावनॅत शिमूला बॅतान मान हॉतॉ. घरात सालुअॅ पक्कॅ लाड हॉअॅशॅ. सालुआ पाठीओर कतीशिमूला दोन पोऱ्यो जाल्यो आन तॅआ मांगॅ दोन बी बाबू जालॅ. बॉलता बॉलता घर भरला. संवसार वाडलॉ तहॉ खर्ससुदा वाडात गॅलॉ. त्योरनॅ शिमू आन कती मीनॅ खटकॅ उड्या लागलॅ. घराशी शांती जरा कमी जाली. कतीऑ लानॉ बाहा कतूआ बेनीआ संवसारोर लक्ष हॉता. अडल्यापडल्याला, आव्नी आन लानी बान्नीला मदत करॅसॉ.

मुंबैला आरे कॉलनीसा बाटल्या दुद या लागला. तॅ शिमूये कय गिराके हुटले. मंग तॅनॅ अॅका इरानॅआ हॉटेलात उकडॉ सालू केलो. पन तॉ इरानी पक्कॉ कडाक. पानी घनॉ सलॅसॉ नाय भगून शिमूइ जाम रगाजळ हॉअॅशी. तॅत तॅइ स मैनॅ एक भय गापटाली. आन एक बारदानी भय वॅताना तिला भांडा आला. दुस्काळात तॅरावॉ मयनॉ हांगातॅत ताहा जाला. गटारी अमावस्याला बोठी वारमोड जाली आन भादवाडीऑ दोनशे केळीऑ भाग आडवॉ जालॉ. थोडकॅत शिमूऑ संवसार आडवॉ जालॉ. भयसॉ दंदॉ भॅहॅलॉ आन केळीऑ ताफॉ आडवॉ जालॉ. घरात तानओड हॉया लागली. तॅत कमी भगून शिमू कुना नादी लागॉन हाकाळ हांज नवटाक-पावशेर घ्या लागलॉ.

दिहोन दि शिमूआ प्या सा वॅसान वाडातुस गॅला. कती कय बोयली बास गा तॉ तीआओर हात टुक्या लागलॉ. पोरे जक्ले लाने. बाप पॅऑन आलॉ गा सऱ्यागत घाबरॉन कडेतरी नीकॉन बॅहॅशे. शिमूयो हाकाबोटश्यो गाडयो सुक्या लागल्यो. पैल्या गाडीला जानारॉ शिमू शार-साडेशारशी गाडी पकड्या लागलॉ. तॅआबनी गिराके हुटया लागले. कावडीशे भांडे कमी कमी

हॉत गेले. आन गॉठॅतश्यो भई पन एकेक करॉन कमी हॉत गेल्यो. एक दि शिमूनॅ कावड खांदयोरनॅ काडॉन खुटीला टांगविली ती कायमशी.

कती बिशारीऑ जीव खाला वर हॉया लागलॉ. पदरी लाने पास पोरे. नवरॉ बॅब्दाड. भाटातसॉ दंदॉ पयल्यान हारकॉ रॅलॉ नाय. जकल्या बाजूनॅ ऑडतान. पन तीनॅ हिम्मत नाय होडली. तीनॅ लोद साफ कॅलॅ. वांगे, दुदी आहा लावीला आन ती रॉज हॉपारशा बजाराआ जा लागली. सालु तिला मदत करॅआ लागलॉ. हळूहळू जक्लो संवसार कती आन सालुआ जिवोर पडलॉ. सालुइ शाळा मीनॅ मीनॅ बूडॅ लागली. शिमू हाकाळ-हांज बक्काट पॅऑन यासॉ. कतॅ जीवलॉ तॅ जीवलॉ नातॅ तॉहॉस नीजॅसॉ. बगॉ तिगाळा शिमूये तंगडे उपर.!!

हाकाबोठे हाकाबोठे शिमूआ हातापायाला कापरी हुटया लागली. शिमूआ आतॅ कय खरा नाय इ जक्लेस हुमजाले. सालुला बो कय कळात नॉता पन कती का हुमजॅसा ता हुमजाली. तिआ जीवाला घनॉस घोर लागलॉ. शीमुला दोन तीनदा इस्पितळात ठोईला. कतीनॅ आशॅआशॅनॅ सगळा कॅला. बॅतान पैसॉ खपवीलॉ. तीऑ बाहा कतू तिआ मांगॅ उबी रॅलॉ. पन उपेग कय जालॉ नाय. शिमूआ पॉटात एक हारको पानी हॉया लागलॉ. तिगाळा शिमूअॅ डॉळॅ उगडलॅ तवपोत उहुर जाल्तॉ. हातसा जक्ला गॅलता. डाक्टरनॅ शेवटसॉ पानी काडलॉ तिगाळा स्पष्ट हांगीला, ‘अहो ताई, कशाला पैशे वाया घालवता आणि त्रास करून घेता काही फायदा नाही. आता परत आनू नका. त्यांची प्यायची इच्छा राहिली असेल तर पिऊ दे त्यांना.’

घारा हाडलॉ आन शार दि नाय जालॅ आन एक दि हाकाबोठेस शीमुला रक्ताई बोठी वांती जाली आन शिमूनॅ कायमशी मान टाकीली. कतीआ पदरी पास पोरे आन डोख्योर कर्ज करॉन शिमूनॅ पन्नाशीआ आतुस आपलॉ कारबार आटपीलॉ.

शिमू गॅलॉ तिगाळा सालु सादारन सवदा वहराव हॉतॉ हायदॅ. आठवीत हॉतॉ. तहीबही वार्शिक परीकशा दिलती. पास जालॅ गा नापास ता बगॅपन शाळीत गॅलॉ नाय. तॅनॅ बाबाआ कावडी बाजूला शाळीसा दफ्तर अडकविला ता माकून कय काडॅ गॅलॉ नाय. आठवीतनॅस सालुइ शाळा हुटली. सालु शाळीत घनॉ हुशार नहलॉ तरी नापास कतॅ जालॉ नाय. बी मिंजॅ आंगाखांद्याय भरलॅलॉ हॉतॉ तॅबनी तॉ शाळीआ कबड्डी मीनॅ तन हॉतॉ. पन आतॅ जक्ला खपला. परिस्थितिनॅ तॅआ लानपन खपविला. तॅला एकदम बॉठा हॉया लागला. कतीला तॅऑस तॅ आदार हॉतॉ. लोक का बॉलदॅत याऑ घनॉ विसार न करता कतीनॅ दुख हॉडॉन माकून बजार सालू कॅलॉ. वारमोड जाल्योर तीनॅ अॅका टॅपराला कागडॉ लाविलतॉ. तॉ थॉडथॉडॉ सुरू जालॉ. तॅआ बरबर तीनॅ तुळस आन सब्जॉ लाविलतॉ. सालुआ मामूऑ भाजीपाल्याऑ बॉठॉ दंदॉ हॉतॉ. मॅरदॅरशा लॉकांय वांगे, दोदी, शिराळॅ, गलकॅ, भेंडॅ ऑहॉ जकलॉ माल तॅआ दरी यासॉ. तॅनॅ सालुऑ एक पास काडलॉ आन तॅला बरबर मुंबै घॅऑन जा लागलॉ.

एक दोन मयनॅत सालु बऱ्यापैकी पहाटलॉ. घरसॉ कागडॉ वाड्या लागलॉ तॉहॉ कतू मामूनॅ सालुला फुलाऑ पास काडॉन दिलॉ. सालु रॉज पैल्या गाडीनॅ दादर फूल बजारा जा लागलॉ. कागडॅआहरी तुळस, सब्जॉ, झिपरीऑ पालॉ आहा जा मिळदॅ ता घॅऑन जा लागलॉ. हाथा रॉजसॉ पैसॉ या लागलॉ. सालुऑ धंदॅत बऱ्यापकी जम भॅहा लागलॉ. मॅरदॅरशॅ जक्ले तॅलास कागडॉ, जर्मन तन द्या लागले. सालुआ ओट्योर कागड्याइ अस्नि बोठ्ठी राहा पड्या लागली. कागडॅयो पुडयो बांदोन सालुआ कमरॅऑ काटॉ एक हॉॲसॉ. लान्यो बेंनी आन बाहा तॅँना जमॅदॅ तही मदत करॅशे. खॉलॅ नीट करॅदो, कागडॉ जॉखॉन दॅदो आन कंडे भऱ्यादो हात लाव्याशे. पन सालु मिंजॅ तॅँव अन्ना तॅँना हांगॅसॉ, 'मरे, नाताल, इनुस आन विजू तुमशी परीक्षा जवळ आले ना, तुमे जा बगु अब्ब्यासाला. मॅ एक हिकलॉ नाय पन तुमे तरी बरे हिका. मॅ आन कती हाय आन काम हाय. आमे बगीतॅव.' शारू भावंडांना सालु बद्दल आदर हॉतॉ. ते कतॅस सालुआ शब्दाआ बार जात नोते.

शार पास वहरात सालुनॅ धंदॅत जम भेवीलॉ.  व्यवारात एकदम चोख अहल्यानॅ जक्ला लोक तॅलास माल द्याशे. एक नवॉ पैसॉ सुदा अडसॉ तडे जासॉ नाय याइ खातरी होती. मेहनत आन ईमानदारीओर धंदॉ वाडलॉ. तॅआस बळोर सालुनॅ कर्ज फेडला. घर पन मॅरदॅरनॅ वाडविला. घरात संडास बांदीला. गोबरगॅस बांदिलॉ. शारू बाहाबेंनी शिक्षनाला कयूस कमी पडॉन दिला नाय. लान्या विजुला तॅ इंग्लिश शाळीत हिकविला.

सालु एकोणीस वीस वहराव असतास तॅला निरोप येतोतॅ. कतीला सुदा उतळी पडलोती. बी मिंजॅ तीआ बळॅ आतॅ पयल्या हारका काम हॉत नॉता. हाकर वाडातोती. कतॅ भुं ऊकातोती. बगुन ती सालुआ मांगॅ लाग्लोती. पन मेरी आन नाताल सा डी एड सा शिक्षान पुरा जाल्याबिगर लगीन करॅसा नाय आहा तॅनॅ ठरविलता. त्यो डीएड ला दुहऱ्या वहरा असताना कतीनॅ जी पोरी बगिली ठरविली तीआहरी मिंजॅ शिजूआहरी सालुनॅ थोडकॅत लगीन कॅला आन संवसारात पडलॉ.

शिजू घनी हिकलेली नोती पन व्यवारी होती. कामात वाग होती आन बॉलॅ-सालॅआदॉ बरी होती. जक्ल्यांना मान दॅऑन मीळॉन मिसळॉन रॅतोती. सालुआ घारा जहनी माव्ली आल्ती. शिजूला एकमेकीआ पाठीओर दोन पोऱ्यो जाल्यो. ताहा सालुनॅ हळुसकन जाऑन अपरीशन करॉन घॅटला. पोऱ्यो बोठ्ठ्यो होयात तव बेनी लग्नायो जाल्यो. दोगींना बऱ्यो शाळा मिळाल्त्यो. तॅतॅन दोगींना बरॅ नवरॅ मिळालॅ. तॅँआ तॅँइस जमविला. सालुनॅ दोगींय लग्ने धूमधडाकॅत केले. सालु आन कतीआ डोख्योरसॉ एकेक भार कमी जालॉ.

इनुस ग्राज्युएट जालॉ आन तॅला इन्कम टॅक्स आफिसात नोकरी लागली. मागोमाग विजू सीए जालॉ. दॉगाय शीक्शने सालुनॅ केले. दोगी मार्गाला लागलॅ. पन इ बग्या कती रेली नाय. तीइ हाकर वाडातुस गेली आन तॅत एक दी अटक ॲऑन कती दॅवाश्या दारा गेली.

इनुस आन विजू मागोमाग लग्नाॲ जालॅ. पन सालु आन तॅआ दॉगाय संवसार ॲका घरात कहॅ अरगॅशॅ? भगून सालुनॅ पुडाकार घॅतलॉ. तॅनॅ कतू मामुला बोलविला आन तॅआ समोरूस इनास आन विजूला वायले घरे बांदया दोन टेपरे बॉठ्या मनान दॅऑन टाकिले. ऑडास नाय तॅ शंबर दीडशे पिडी कागडॉ होतोतो तॉ कागडॉ कापॉन टाकीलॉ. दोनू बाहाइ अस्ने बोठ्ठे घरे बांदीले. ते कामोर जाशॅ तॅ सालुस जक्लि देकरेक करतोतॉ. कय हाड ने तॅनॅस केली. सॉता घरापरमानॅ जक्ला कॅला. कागडॉ कापीलॉ आन सालुआ पैशाव मार्ग बन जालॉ. तॅनॅ फुलाऑ पास बन करॉन तॉ घारा बॅहॅलॉ.

सॉताआ पोऱ्याये शीक्शने सालू होते पन सालुला घनी काळजी बाहाश्या घराइ होती. दॉगाय बंगलॅ जालॅ, लग्ने जाले तिगाळा कडे सालुऑ जीव हॅंवसॉधॉक जालॉ. दोनू बेनी आन दोनू बाहा एकदाशॅ संवसारा मारगाला लागलॅ तिगाळा सालुला आहा वाटॅ लागला जहनी जन्मा आल्या सार्थक जाला. तॅनॅ फुलाऑ पास कायमसॉ बन कॅलॉ. तॅनॅ जक्ल्यो पागो रानोर टाकील्यो आन तॉ एकदम सुशॅगात जालॉ. हाकाळ-हांज लीगरी लीगरी घ्या लागलॉ. पोऱ्यो बोठ्यो जाल्यो. घन्योस नाय पन हारक्यो-हुरक्यो हिक्ल्यो. तॅय लग्ने जवळ आले पन इनुस आन विजूनॅ तॅत घनास कय लक्ष घायला नाय. तॅ, तॅयो नव्यो नवऱ्यो, नवे हयरे-दोयरे आन नव्या संवसारात ओडे गुतलोते गा आपल्या अन्नाआ काहा सल्ले, तॅआ पोऱ्यां काहा सल्ले याइ कैस परवा नोती. कतॅ विसारला पन नाय. जॅआ अन्नानॅ आपल्याकरता तॅइ आख्खी हयात घालविली, तॅला कय अडसन हाय गा, कय कमी जास्ती पडातॅ याव विसार सुदा तॅंइ कतॅ कॅलॉ नाय.

सालुऑ पास बन जालतॉ. पोऱ्यांय लग्ने आल्ते. खर्स हॉतॉ पन तॅनॅ तॅआ बाहापुडॅ हात नाय पसारलॉ. तॅनॅ आन शिजूनॅ कहीतरी हांदहुंद करॉन पोऱ्यांय लग्ने पार पाडले. इनुस विजूनॅ आंहातांहा थॉडाफार बगीला नाय आहा नाय पन तॉडॅपुरतास.

वयाश्या सौदा वहरापासून सालु कुटूमाकरता झिजलॉ. बाहाबेनॅआ हारकाहुरका कॅला. बारोजी तॅ केली नाइस पन बाहाबेनॅकरता सॉताऑ संवसार उग्ड्योर टाकीलॉ आन तॉस सालु सॉता पार उग्ड्योर पडलॉ. दरी पैसॉ नाय, उत्पान नाय. बारीक सारीक आजारपने मांगॅ लाग्लोते. अहॅ वाईट दी तॅआ वाटॅ आल्तॅ. पोऱ्यो आन जावाय हाड ने करतोते पन हारका हारका तॅंपा मांगॅसा सालुला आवडात नॉता. खरा मिंजॅ इ जक्ला इनुस आन विजूनॅ बगॅ पावता. तॅंआ अन्नाओर ओ वखत तॅंइ यॅऑन द्या पा नॉतॉ. अन्नानॅ तॅंशा करता कॉहॉ जीव आटविलॉ इ तॅंआ बायकां गाइ नायदॅ पन इनुस आन विजूला तॅ मईत हॉता. सालुआ शिजूला तॅंआ दॉगाव पक्कॉ राग यासॉ. पन सालुआ पुडॅ तीआ कय सलात नॉता. मंग ती जक्लॉ राग सालुओर काडॅशी. सालुला फाडफाड आयक्यावॅशी. सालुला तीआ बॉलना पटातोता पन त्योरनॅ तॉ इनुस आन

विजुला कय बोयलॉ तॅ आतॅपरात जा का कॅलॅ ता फुकाट गॅल्याहारका हॉयदॅ भगून तॉ मुक्काळॅ जक्ला सहन करतोतॉ.

कतू मामुसा आतॅ वय जाल्ता. पन यो जक्ल्यो वारता तॅआ कानोर जातोत्यो. तॅला इ अज्जिबात पटात नॉता. तॅनॅस सालुऑ न्याय करॅसॉ ठरविलॉ. कतूमामा एक आयत्वारॅ पॉराला घॅऑन सालुआ घारा गॅलॉ. तॅनॅ इनुस आन विजूला तडॅ बोलविला. सालुयो दोन बेनी मेरी आन नातालला सुदा तडॅ बोलविला. कतूमामाऑ निरोप येता खोटी जक्ले गरगरॅ धावात आले. आदी खबारबात तन जाली. शा पानी जालॉ. आन मंग कतू मामूनॅ विशयालास हात घायलॉ. तवपोत कुनाला कयूस कळाला नाय गा मामू कूनाबद्दल आन कॅबद्दल बॉलातॅ.

मंग सालुनॅ लान्या वयापासून कुटूमाकरतान का का कॅलॅ, कहयो खस्त्यो खाल्यात आन जकल्याय शीक्शाने, लग्ने कहे केले ता सब्बान सविस्तर हांगीला. आज ते जे सुखात आनंदात हात ता सालुमूळॅस. मामूनॅ सालुआ आख्ख्या आयुश्याव पाडॉ वाशीलॉ. सालुअॅ बाहा बेनी मान खाला घालॉन जक्ला आयकातोते. मेरी आन नातालश्या डॉळॅतनॅ आहु वाया लागलॅ. मामूला का हांगॅसा हाय ता तॅँना हुमजाला. तॅँआ काळजापोत पॉस्ला. मामूआ जक्ला हांगॉन जाल्योर बोठी बेन मेरी उबी रेली. तीनॅ सालुला वॅंग मारॉन ती खपखपॅ रड्या लागली. डॉळॅ पुहॉन ती बोयली, ‘माला बऱ्यापकी पेन्शन मिळातॅ, माये पोरे बरे कामायते जाल्यात. मॅ पुडश्या मयन्यापासून अन्नाला पास हजार रुपय देत जायनॅ. ऑ माऑ सब्द हाय.’ ऑडॅत नाताल बोयली ‘मॅ पन पास हजार देनॅ.’

आपल्यो बेनी ऑडा कऱ्या लागलॅत तॅ आपल्याला पन कय कॅला पाय आहा सालुआ बाहांना वाटॅ लागला. आदी विजू बोयलॉ, ‘मामू आमे आमश्या अन्नाला कतॅस टाक्याशे नात. तॅनॅ तॅआ आख्खा लाईफ आमाला दीलॅ, आमे कॉडा जरी कॅला तरी तॅइ भरपाई होऊ शके नाय. मॅ दर मयन्याला दा हजार अन्ना अकाऊंट मिंनॅ टाकीनॅ.’ इ आयकॉन इनुसनॅ सुदा दा हजार द्याशॅ कबूल कॅलॅ.’ इ जक्ला सल्लोता पन सालु एक सब्द बॉलात नॉतॉ. तॅआ डॉळॅतनॅ नुस्ते आहों गळातोते. तॅ पश्चातापाय हॉतॅ गा आनंदाय हॉतॅ ता कय कळात नॉता. कतू मामूला पन आहों आवरात नॉतॅ. कतू मामूनॅ त्याय डॉळॅ पुहिलॅ आन तॉ बोयलॉ, ‘तुमे जक्ले माये भासोंडे हा. याऑ माला खुब अबीमान वाटातॅ. तुमे आपल्या समाजापुडॅ एक नवॉ आदर्श उबॉ कॅलॅ. देव तुमसा आन तुमश्या पॉरांबाळां बरा कॅलॅबिगर रॅसॉ नाय.’ याला बॉलातॅत खरा “फॅमेली पेन्शन.”

# आगरा -डाँगराशो कान्यो

■ ऑल्विन परेरा, अक्करभाट-नानभाट

बाबूकाका दोनी पॉराई भाटशा राटाव सौदॉ पॅलारशा सय्यद वखारवाळ्याला कॅलतॉ. बाबू ओट्योरशा मेडी मॅरॅ पायोर बॅहॉन बिडी पेत आयकातोतॉ; “आतॅ भाटात मोटर आले, बैल कुन बाळगितॅ? राटोर गावशे पोरे दॉपारा गरय गिथी बाडूक धऱ्या बॅहात्यात नायतॅ पत्ते खॅळात्यात. बी राटा कागुळ्योर शीडी पन घरबॉ कऱ्या ये नाय आतॅ. मंग ठव कदो?..” बाबूआ लक्ष त्योरसा उडला, तॉ एकशिती जालॉ. बिडी जहीजही बारकी हॉत गेली तॉहॉ बाबूपन त्या बारक्यापनात गॅलॉ.

पयला महायुद्ध खपता खपता बॉठ्याबाबा नाव सलव्यादो फरसूल्या मिंग्यातॅ बाबू जालॉ. बाबू नाव फरशा मिंग्या आन बाबा नाव मिंग्या फरशा. पेपरोर लिईला तॅ कुन कुनाव बाबा ता हांगता यासा नाय पन तरा तहीस होती तॅ बॉठ्याबाबा नाव पुडॅ लॉटला.

बाळटीम कग्रा देवळा फादर ब्रांझ शिल हॉतॉ. कागदोर फ्रान्सिस्को लिवीला तरी फरशाला ‘बाबू’ नाव पडला. त्या जाला का? मिंग्याई पिली १२ वहराई जाली, पिलीआ हयरा जाला! तिगाळा मिंग्यातॅ अवलद जाली मंजॅस आपलॉ बाबू जालॉ. मिंग्या तेरीतॅ मीन्नॅस एखुंद कय जालता हांगातॅ पन ता मावलीला गॉड जाला. असो, बाबूयॅ नॅलवाड कॉडॅ! बाबूला समज ये ये तव पिलीबाय वराडली. मंग पिलीबायतॅ कय जाला तिगाळा पिलीबायशा हरी फरशाबाबू पन उजारलॉ. लाडकॉ बाबूमामा गनाई! बाबू काईम डोकऱ्या बयदरीस अहाता. डोकऱ्याबयला कापरी लागलोती आतॅ. पान नंदार एकदम साप. आख्खोदी ईंधाळ्यात बॅहाशी. कापरी पायान ती मान हासकीती ऱ्याशी आन बाबू ती पुडॅ बॅहॉन तिआ कानाशो सब्बान वाळ्यो डॉलताना बगीत रेतोतॉ. त्याला त्या वाळ्या किनकिन आवाजाई बोठी गंमत वाट्याशी.

बाबू १० वहराव जालॉ तिगाळा त्यो वाळ्यो वाजाशो थांबल्यो,डोकरीनॅ डॉळ मिडकीलॅ. वाळ्याई आन माडीओर तूहाशा पराड्यात जा का बयसा ईस्टाल हॉता त्याई लेक्या- ऑआरात वाटनी जाली, मिंग्या आन काका पनू भाटशा वाटनीला बेहेले. काकानॅ राटा मनोर गॅठला, मिंग्यो लानॉ तॅ हा ला हा कॅला आन दॉआई राटा कामाला हात घायलॉ.

दॅगामावसॉ नावदार मिस्तरी. तॅनॅ बावखालाई देखणी-आखणी केली आन पूहाशा तोंडोर लाकडादो जासॉ ठराव कॅलॉ. तडनॅस हांगातॅ तांड्या बैलबजार पन बगॉन हॉयदॅ आहा एकुंदरीत एवजिला. तांडा मंजॅ आजसा संतोषभूवन. हिंबळोरशी जत्रा खपली, गा नाताळशा हनापासून तांड्योर देशोरशॅ गाठीमाहणे ढोरे विक्या बजार भरव्याशे. मंग तॉ मगा-पुहू खप्यापोत घाटी तडेस ऱ्याशे. होळी नजिक आली गा ढॉरबजार ऊगाळ्यासॉ.

असो, दॅगामिस्तरी, काका, मिंग्या आन हरोर बाबू आहा कटांबळा निंगाला हॉपारा बंदरोर वखारीत. तिगाळा तुसखाडीपासून रेल्वे कारशेडपोत भल्ली खाडी होती. सादारणी आज विराडा सिगनलपा पटेल टिंबर मार्ट हाय तडे वखार होती आन तडसा लाकूड हाड्यासा.

कय हागली, कय खैरा ऑहॉ सौदॉ पटवॉन आन जा नाय मिळॅ त्यादो डॉंगरा शिवणसई जासा आहा ठरवॉन तिनू गाडे मांगूलवट आले. मिस्तऱ्याई कामाला मोर्त घॅटलॉ. बाबूला जालती जाम होस; तॅत्यान तॉ गॅलॉ दॅगामावशा घारा ऱ्यादो. बाबू एकोक वस्तू घडताना बगितोतॉ.

बी मॅरॅ काका आन मिंग्या झूपलोते थाट्याए तागॅ, हुंब, बांड्यो याई वॅवस्ता कऱ्यादो. काकानॅ बाबूला हुंब पायाशा मॅठ्यात धरॉन नाकापोत लांब ऑडॉ कुडकॉ पाड्यासॉ, ई एक माप मंजॅ एक 'घड्डाव' आनू थाटॅ एकोर एक मंग एकोर तिन अहॅ वाळॉन 'माळ' बांद्या हिकविला.

आखेरीदो बावखाल डॅवॅला गा खॅरॉ काडॉन पानखांबॅ शिव्ल्यलॅ पात तॅत्यान डॉंगरा जासॉ बेत जालॉ. माकून तिन गाडे जमायले. गाड्यायो हाट्यो काडल्यो. बॉठ्ठं खांब, घरादो घॉणॅ, वाहॅ, अहॅ लांबॅ बूंद्याए नग वायाशॅ अहलॅ गा मिंगॅ गाड्याई हाटी काड्याशी आन नग लांबॅ लांबॅ अहॅ गाड्यात आथऱ्याशॅ.

असो, जासॉ दि ठरलॉ. घारा डॉंगराई मावटी बो आले पन सवता डॉंगरा जासा, का हायदॅ तडे? काहा हायदॅ? बाबू हप्प्य रात निज नाय.

डॉंगरा जासॉ दि उजाडलॉ. दॉपारशे जिवनेखावने जाले, डोख्योरसॉ दि नाख्खॉडॉ दऱ्यालागली गॅलॉ आन मॉताबाबा मोरक्यो, मिनॅ मिंग्यो आन मांगॅ काका, परतेक गाड्यान दोन दोन गव अहे तिन गाडे हाखयले. बाबूदरी कॉथळा धऱ्या दिलता. साउळ, हुक्कॅ बुंबूल, तॅल, वांगा बटाट, मशालॉ अही मावटी जिन्नस. आन बाबूला ता काय बॉठ्ठा ईस्टाल वाटलोता!

जिवदानी, कनॅर, मांडवी करीत काळोख पडता नावळ पोसली शिवणसईला. बाबू मिंग्याला विसारतॅ, “बाबो आपून पुडॅ पुडॅ साल्ले तॅ लांबशॅ डोंगर पन मांगॅ मांगॅ कहॅ जात्यात?” मिंग्या नुसतॉ हावलॉ.

गाडे होडले, बैलादो पॅंडॉ  पाणी जालॉ आन दगड मांडॉन मॉताबाबानॅ सयपाक कॅलॉ. मॉताबाबा हाथाला काय सव! लग्नेमोर्ते अहलेगा तॉस हिजविता. मॅरशा हॅतात वसयशा वाडवळाई गाडे होडलोते. वाडवळादरी बैलाये नाय, भैयशाए गाडे. काकानॅ विसारला तिगाळा एक हांगातॅ, “मुळगावशे आमी. आमसं देवळां काम सालू करासं हाय तवा अटे घोणे घ्याला आले, बिजे चिंचोटी जंगलात गेल्यात.”  वाडवळ हॉकरॅ का कऱ्याशॅ, झाड काप्यासा परमिट बुडोर मिळ्यासा. एक परमिट मंजॅ एक बुड. मंग यॅ भर जंगलात खिरॉन एका बुडातनॅ दोन बुंदॅ निंगालॅला झाड शॉदॉन काप्याशॅ. मंग ता भयशॅ लावॉन डॉंगरा जंगलातनॅ ताळीत न्यासा खाला.

असो, हाकोवटे वखार उगडली, सौदॉ जालॉ, खांब्याए गाडे झुपले मॉताबाबानॅ बैलाई हॅपाट पिळली. तिगाळा परांडी न्याशी नाय. बैलाला परांडी मारना गुन्हॉ हॉतॉ. पकडला तॅ बैला हॅगाट गाडा गॅला. सादारणी बारा वाज्या गाडे पिरकुंडा आले गा बैल हॉड्याशे. आन बाबू ज्या वाट

बगितोतॉ ती मावटी अडेस हिजातॅ ई त्याला हुमजाला. सयपाक वाडीस कॅलॉ. डाँगरा मावटी वाट बगित घारा पोरेटोरे होसयलेले हायद्यात ई जकल्या धॅनात हॉता.

असो, वहरी गॅला आन् बाबूनॅ राट ऊबी रॅता डॉळॅशॅन बगिलॅ.

उब्बक, साक, वनफळ, जॉहार, आपय, दाबाड्या, पटाळॅ, कागुळा, पानखांबॅ, माळहरॉ, पाडिया, पोंदळ; काय ती सॉबा! पडत्या फॅऱ्यात वहरे भरते रेले. बाबूतॅ बाब्योन् बाबू जालॅ. ज्या नावोरनॅ बाबूआ नाव दिलता तॉ दादा फरसूल्या गॅलॉ, मिंग्याबाबा गॅलॉ, राटा बांदनिए दॅगा मिस्तरी, मॉताबाबा जकले राटा फॅऱ्यात गुडूप जाले पन आश्विन ऊंगवलॉ गा नारायण बॉलतॉ हॉयासॉ-राट करकरतॉ रॅलॉ.

बाबूनॅ विद्या पुडॅ निली. सवता पँड्या-सुली लाकूडादो डाँगरा जा लागलॉ. मावटी हाडीत रॅलॉ.

आतॅ भाटात खप्या येत्यात ते वारली लोक पन पयरॅ-कोती कय टुकॉन नेत नाय पन तिगाळा एक हावळी कडे पडली गा सरगातनॅ मान्ना पडल्याआंगडा लोक धाव माऱ्यासा. १९४८ शा दिवाळी नंतरशा वारमोडीनंतर कय झाडपान रॅला नाय. नवॅ रॉपॅ वाड्यापोत तॅ लॉकाय हाल कय घनॅस जालॅ. घरोर मोते टाक्या हावळी नोती. मोते मंजॅ आतॅ पोंदळ टाकीत्यात तह्यो २ वळल्यो हावळ्यो निऱ्यो करॉन बांद्याशो. घराला सॉबा येतोती.

तिगाळा सयपाकपाण्यादो सुली आन त्या पायान एक हावळी काडीपन अही कडे पडलेली नंद्र्या पडात नोती. भाटात कोती आन मांडॅऱ्योरनॅ कजे होयाशे बायकाबायकात. कय लोक हेणी पन सोरतोता, मंग दांडात झिवरी पडले हायदॅ तॅ कुन काहा टाकिदॅ? पाहाळ्यादो लाकूड भऱ्यासा. मंग लाकडादो जंगलपट्टी डाँगरात गाडे न्याशे. लाकूड आहासू सगळा भेळशेळ. शिवणसई, वज्रेश्वरीला 'कुप' पड्याशे. कुप पडलॅ मिंजॅ लाकूडाव बजार.

बाबू आतॅ गाड्याव मोरपी जालतॉ तिन अहो गा शार गाडे पन बैल तॉफ्फार पात आहा बाबू हांग्यासॉ. सादारणी दिड- दोन खांडी लाकूड हाटीओर यासा. खांडीला ४०० किलो आसपास वजान. बैल जॉडॅ तॉफ्फार तॉडा लाकूड, पिक घना येता गाड्याला.

गावड्या मंजॅ आजशा मनवेलपाड्या बाबू आव्यासॉ. लाणीबांदणी जाली तरी पिक तडेस खारीत २-४ मयनॅ उडवा मारॉन ठव्यासा. गावड्यापासून पार आपल्याअडे यॅ तव पाणी भरलॅलॉ अह्यासॉ. गाडा जासा यासा कडनॅ? मंग कॉरास्मॉ लाग्याशा पुडनॅ पिक घारा हाड्यासा.

तॉफ्फार बैल, कय भई पन अहाता गॉठ्यात मिंगॅ पँडॉ घरसॉ कय पुरॉ पडातॅ गा? परत गाडे हाक्याशे डाँगरा पँड्यादो. पँडॉ वजनान हळखॉ पन वॅप बॉठ्ठॉ मिंगॅ गाड्याई हाटी काडॉन हाटॉ कऱ्यासॉ. गाड्या आहाला डांबऱ्या आन साकावरनॅ माळ्या टाकॉन गाड्या आंगा बार तिन बांबू काडॉन व्याप बॉठ्ठॉ कऱ्यासॉ गा जालॉ हाटॉ. एक बुठ्ठी ५ किलोई हायदॅ, आन् दोन बुठ्ठीऑ एक पँडॉ आहा माप. कय साठ कय ऐशी पँडॉ बैला आयपतीपरमानॅ हाट्योर भऱ्यासॉ. मंग वाट्यात पँडॉ फॉकालॉ पा नाय बघून वरनॅ पाहाटी मंजॅ भेंडीए बारीक थादॅ जॉक्कॉन शाकाऱ्याशॅ. हाट्या बांबूला दोऊ मॅऱ्याला जक्याशॅ.

लाकूडा गाडा दुहरॅ दि परत घारा यासा पन पँड्यादो लोक केळठण, खानिवड्या, घोटगाव, ढॅखाळ्यापोत जातोता. घोटगावसा गाडा तिहरॅ दि आन वरईसा गाडा सौत्या दि परत येतोता. बाबूऑ दोसत खानिवड्याऑ. बैलाला पन रस्तॉ मयती जालतॉ. घारा परात येताना कनॅरफाटॉ यॅ यॅ तव दि मावळताला जासॉ. मंग बैल पन गिरळीहांगडॅ पळ्या हुट्याशॅ. त्यांना पन काळोखपड्याशा आदी घारा पॉशाशी उतळी हॉयाशी बोवतेक. बैल जाम हुशार!

बाबूला बैला जाम वॅड. आगुकॉपात बैलाव पारखी. तांड्या बैल बग्या जादो कॉपातला विसारल्याबिगीर कुन गॅलॅ हायदॅ आहा नाय!

आगुकॉपात मंग बजारात खिरलॉ गा आपून नुसता आयक्यासा बास. “गरॅ कॉपात, यॉ बाळॉ बरॉ दिखातॅ. त्या मॅरॅ तॉ काब्रॉ सॉबॅदॅ, दोआयो वहनाळ्यो बो मजबूत हात. हिंगे पन खोबरे हात हस्साल शा हस्साल. कॉपात कत्तॅपन खोडी पयल्यो बग्याशो ढॉरात. डॉळ्यात तॅस पाय, दात आठ आन सोटकुली मीनॅ पाय. मस्ताकोर एक आन पाठीओर एकूस भॉवरॉ अहलॉ पाय. पाठीओरसॉ भॉवरॉ मांगशा बाजूला अहलॉ गा त्याला बिन हांगत्यात. पाठीओर दोन भॉवरॅ जॅ अहलॅ त्याला कावड्या बॉलत्यात. हॅप्या मॅऱ्याला लव्याशो वेली हायद्यात तॅ तॉ गांड्या गॉम. हॅपाट पयली बग्याशी दवणी हींगा गथीन बारीक आन मागशा पायाशा मुऱ्यापोतूस अह्यापाय. तोकडी हायदॅ तॅ तॉ तानतोड आन मुऱ्या खाला पोत हायदॅ तॅ तॉ बाऱ्यो. बैला गळ्याखालशी वाकळ पात्ताळ पाय, जाड नाका त्योर लव्याशो वेली नाका. डाव्या कानामागॅ वेणी हायदॅ तॅ तॉ गवण मोरु आन उजव्याकानामागॅ वेणी हायदॅ तॅ तॉ गवण धर. कॉपात तुमाला मॅ हांगातॅ, ढॉर पसान कऱ्यासा कय खासा काम नाय. अह्यो खोडी हत्यात बैलाला.”

असो, आगुकॉपातनॅ पारखॉन घेटलेल्या बऱ्या ३-४ जोड्याई जलमभर बाबूऑ राट वाईलॉ, गाडे ताळले. बंगली बांदीली त्यादो जिवदानी डॉंगराशो काळ्यो तोडी, निळडोंगरीशॅ पांडरॅ दगड, रानोरशी रेती वाईली, सुन्या घाणीला पन जुपलॅ. शेवटीशेवटी एक खैऱ्या बाळ्या डॉबॉ जालॅलॉ रॅलतॉ. तांबडॉ बैल आन त्योरनॅ तांबडॅ पट्टॅ, सॉबातोतॉ गनाई!

डॉबॉ खाटकाला विकीलॉ तिगाळा बाबू लेक डॅवाताना रडात्यात तॉहॉ रडलॉ.

बिडी खपली, बाबूला जॉराय खाक आली तॉहॉ बाबू उठलॉन तडाक राटोर निंगालॉ. हिवरालागली वालाए टापू, रवयशॅ माडॅ भॅराटाई वाकळ घॅऑन निजलोते.कांड्योरनॅ सलताना वईओरसॉ खरोदॉ, हजारी खॉलॅ दव्याए निथळातोते. लांबशा वाडीत कुनॅ ईंजान लाईलता त्याव घर्रर्रर बारकॉ आवाज होडलॉ तॅ आख्ख्या वाडीत सामसूम हॉता. मिन्नॅस एखाद अंगाट मॉडल्याव, हावळी पडल्याव आवाज. बाबूनॅ मनभरॉन राटा एकएक हांदॉन् हांद्योरनॅ हाथ फिरविलॉ, गॉकॅ घॅटलॅ, राटोरसॉ वास एकदास शातीत भरलॉ. जड डॉळ्याय शेवटसॉ निरोप देताना बोयलॉ, “डॉंगरातनॅ आलतॉ, डॉंगरा साल्लॉ. हारकॉ जाय.”

# तिहरी शीटी

■ **इनास तुस्कान, गाहा**

लग्नाय बरे अठरा-वीस वहरे भरल्योर सालु काका पॉटा.. आतॅ सालु काकाआ पॉटाआ, या शब्दाओ तॉस अर्थ नाका घॅऑ, नातॅ हांगॅद्या सालु काकासा पॉट कतॅ पिकला..? तॅ सालु काकाश्या पॉटा मिंजॅस सालु काकाआ मरशानश्या पॉटा मरश्या नावाशी दौलत अवलती रुपान भेठ्लोती. ताहा बगीला तॅ खऱ्या हीसापाला मरश्या नवसाव हांग्यादो पन कय वांदॉ नाय. कारन नवसाई अवलत जरा अवलीस आहातॅ. आन मरश्या कय कमी अवली नॉतॉ. त्याबनॅस गावात तॅला कून पोरी द्यादो बगीत नॉता. नायतॅ गावात पोऱ्यांव कय तॉटॉ पडलॉ नॉतॉ. फक्त मरश्यादो कून वेली नोती.

मरश्या अठरा वहराव जालॉ आन सालु काकाला तॅआ लग्नाअॅ वॅद लागलॅ. कारन सालुला अवलत लेट गेली पन आतॅ नातोंडे लेट नाका भगून सालु काकानॅ मरश्या कडी खाला लग्नाई सुल पॅट्व्या सुरवात केली. आगाय पासून तॅ भिगावा पोत... आन गिरजा लागला तॅ पार सुळण्या-मानीपुऱ्या पोत सालु काकानॅ बेतान ठिकानी सापारॅ मारलॅ मरश्या होयरा करता. तॅये पायताने झिजले, पन मरश्याआ नशीब जा पातॅरॅआ खाला ढाख्लोता तॅ तॉ पातॅरॉ कय हुरात नॉतॉ आन मरश्या नशीब कय उग्डा पडात नॉता. शेवटाला सालमत फुयो मीनॅ पडलॉ, आन तॅनॅ रेवदांड्याआ जॅक मारॉन तॅइ फिल्यात 'फूलमॅन' यादो बगीली. आन एकदासॉ बाबा आंदळॅव पाय पडलॉ मांदेळ्योर.

शाल्मत फुयाशी फिल्यात खॅप्पॅन रेवदांडयाशी कही ? आन ऑ शाल्मत फुयो जक्ला खप्ला आन डायरेक रेवदांडया फिल्यात घ्यादो कहॉ का उंडालॉ ? ऑ प्रश्न जहॉ तुमाला पडलॅ ना तॅआखीरी तॅआ सवालानॅ माआ डॉखॅत हेंडोळ घाईलती. जास्ती तगॉन धरी नाय मॅ मंडळी. तुमाला डायरेकूस हांगातॅ शाल्मतशी फिल्यात स्टोरी.

या शाल्मत फुयाशी लव स्टोरी पन बो बोठ्ठी कानी हाय. ती हांग्या बरास टाइम जायदॅ आन मरश्याइ कानी रॅदॅ. तॅ 'इ' रेवदांडयाइ पोरी जी मरश्यादो केले, तीइ बय 'पशी' शाल्मत फुयाशी जुनी मैत्रन. दॉँगा ॲकमॅकोर बो प्रेम ऑथा. पन शाल्मत फुयाश्या बाबाला इ लव्ह स्टोरी कय पसांत नोती. तॅनॅ शाल्मतला तंबीस दिलती जॅ पशी हरी तू सबंद ठोईलॅ गा तुला घरातनॅ हापाटीलास भगून समाज. नावीजाला शाल्मतला पशी हॉड्या लागली. पन सॉरे-मारे शाल्मत पशीला भॅटॉसा कय होडीत नॉतॉ. गुजराती बॉलातॅत ताहा 'भुते नो वास पिंपडे' (दुनिया कॅला.. तरी भूत पिंपळा झाडोरूस जासा). तही गत. शाल्मतला जमीन विक्ती घॅऑन कय कहीता आली नाय. पन तॅनॅ अर्दलीन जमीन कहिली आन या कानीऑ गॉड शेवट मिंजॅ इ 'फूलमॅन' तॅइ फिल्यात.

कार्तिकाआ पयल्या आठवारात मरश्या लग्नाई तारीक पक्की जाली. आश्विन उंगावता पयली शीटी पडली... दुहरी पडली.... तिहऱ्या शीटीला मात्र थोडी गडबाड जाली. गावश्या दॅवळाव फादर मोजेस (पॅरीश प्रिस्ट) कडॅ तरी बार गॅलतॉ लॅमकॉ यास आयत्वारॅ. तॅआ जाग्योर फा. बुर्गेंझा (गॉअॅंकर) आल्तॉ एक दिहासा मिसा करॅदो. तॅनॅ मरश्याइ तिहरी शीटी वाशिताना रेवदांडया जाग्योर सूकॉन 'खारदांडा' आहा वाशिला आन तास लॅमका सालु काकाला खटकाला.

आरॅ पन बुर्गेंझा फादरनॅ आख्खा मिसा कॅला पंद्रा मिनटाऑ शरमाव कॅलॉ तॅत का बोयला ता सालु काकाला एक आन्या पन मईत नाय. त्योर या पुतासा धॅन नाय. पन रेवदांडया सा खारदांडा बोयला ता बरा लॅमका सालुआ धॅनात आला. या धॅन मिस्सोर आन शरमाव वर नॉतास. या धॅन या पुताई तिहरी शीटी पड्याशी त्योर ऑथा. मिंजॅस सॉराइ नंदार बोसक्योर. आन आलॅ हायदॅ बिशाऱ्या बुर्गेंझा फादरशा तॉंडातनॅ खारदांडा, पावनॉ फादर तॉआपलॉ... भगून का तूऑ कप्पॉ खडलॉ.? गा तुई ओ खारदांडयाशी हांगिली भगून का खार पाटलाई जाली गा..?

मिस हुटता खोटी सालू नाय गा फादरला झुंबलॉ. बरा जाला तडे पेद्रु मॅस्ता आन बिअॅ दोगी शोगी बुजुर्ग माहने होथे तॅइ सालूइ समज काडली. फा. बुर्गेंझा बगीतॅ, मॅ इ बदली मिसा

करॅ यॅतॉ मॅलॉ. बदली मिसा तॅला बो मागात पडली. फादरनॅ पन बॉठ्ठ्या मनान सॉरी बोयला सालुला. विशय मिटलॉतॉ बेसखास्सॉ पन तॅआ अक्कर माश्या बस्तूलॅला कम्बख्ती, तॅ तॅनॅ पन मीनॅ तॉंड घालॅ गा.. हॉकरॉ देवळा वहरातनॅ दोनदास... एक नाताळश्या हनाला आन बीऑ गुड फ्रायडेलास येतॅ, तॉ लॅमकॉ कॉहॉ तॅआस दिहा देवळा आलॉ बग गनी. अच्छा ! आतॅ अवले गाइ नवले जाल्ते आन कुत्रे पावने आल्ते तही गत. तू नवला परी देवळा आल्तॉ तॅ मुक्कालॅ देऊळ हुट्ल्योर घरसॉ रस्स्तॉ पकड्योवतॉ सोप्पट. तू कदो लॉकांसा हगीला आंगाला सोळीत बॅहॅलॉ. मॅटर मरश्याआ हाय तॅनॅ निस्तारलॉसॉ. कुत्रा जानॅ आन सामडा जानॅ. तुला का पंचत पड्लोती..?

पन कळ नाहेदॅ तॅ तडे पन कळ जॅ नाय घायली तॅ तॉ बस्तूल्या कॅव. बस्तूल्या हांगातॅ खारदांडा का आन रेवदांडा का..? दॉंगा मांगी दांडास हाय ना ? पुडॅ तॅ कुनाव नाय ना ? आन ता रेवदांडया खारदांडा जाला तॅ, तॅहॅ कय तुइ ओ काळी माव हाय, ती का गोरी हवनार होथी गा का ?

ऑडॅत सालू हाय कडे. तूआ मायला हॉकरॅआ. मा ओ ला काळी माव हांगाता ?  तूआ ओ पेक्षा हिंव बरी दिखातॅ..! साळया आज आठ मयनॅ जालॅ तूइ ओ जाऑन मायारा बेहेले, अडे तुमी दोगी बाप पूत बायलॅ घती ठाव-भांडा, सयपाक आन जक्लॉ पानी-पाहा करतॅआ. हाकोटे रांदीलॅ ता हांसा खात्या आन ती हिंव तडे मायारा राज करतॅ आन तू माआ ओ ला काळी माव हांगाता. ?

सालूनॅ तडेस उपटी खोशीली आन बस्तूल्यासा गप्साट पकडला. हुतेरीया हुटला आन पातेरीया झुप्ला. हाय हाय तंव दोगाई झुंबी पडली. पेद्रु मॅस्ता फादरश्या हरी बॉलतॉ हॉथॉ तटनॅस तॅनॅ दॉगांना दोऊ मॅरॅ कॅला आन हॉडवा होडव केली. दोगू खाला ॲकमॅका आंगोर पडलोतॅ, दॉगाय पोने धुळियॅ माखले. सालूआ कब्जा खिशात दोन एक आण्याई शिल्लर होथी ती फॉकाली.

या दॉगांशी लठ्ठा लठ्ठी पडली ती बगॉन बुर्गेंझा फादरशी गाबोळी फाटली. तॉ बगीतॅ अडॅ कय बरॅइ बाजू नाय. कळ पन माआस पायान पडले. तॅनॅ हळुसकन लोब खोशीलॉ आन शिदी टांग मारली सायकलला. तॉ विसार करतॅ या पॅरिश मीनॅ कून शान्या इखाव दिखॅ नाय. फा. मोझेस अडॅ कहॅ का दि काडतॅ ता दॅवालास मइती.

फादर सायकली वरनॅ निंगालॉ तॉहॉ पेद्रु मॅस्ता तॅआ मांगी धाव्या लागलॉ. फादर...SSSS फादर..SSS थांबा गनी. फादर शा तयार हाय तुमादो. फिल्शि बायनॅ खास तुमादो मॉराय लाडू कॅल्यात तॅ धाडलॅत. मॅ आमलेट आन ब्रेड पन रेडी ठवीलॅ तुमादो. फादर कदो आयकातॅ. तॉ पार गेटवरनॅ सडक्योर पॉस्लॉ परी पेद्रु मॅस्ता फादरश्या मांगो मांग धावातॅ. फादर मॅ आमश्या फादरला जबाब का दॅसॉ, तुमी बिन शा नॅ साल्ले. पेद्रु मॅस्ता जॉडॉ फादरश्या मांगी आड्डात आड्डात धावातॅ तॉहॉ तॉहॉ फादर जॉराय सायकलसा पायडल मारतॅ, आन पुडॅस पळातॅ. कय कॅला फा. बुर्गेंझा थांब्यासा नाव घे नाय. फादर मांगी बगीतॅ

आन पुडॅ पायडल मारतॅ. तव पोत पेद्रु मॅस्ता गेट पोत पॉस्लॉ पन फादर त्याहून पन पुडॅ सड्क्योर दॅवळा मांगश्या खुरसापोत पॉस्लॉ. फादर झॅट थांब्यासा नाव घे नाय. तहा पेद्रु मॅस्तानॅ तॅआ भ्रमास्त्र होडला. देवळा मेन गेटवरने मांगश्या खुरूसापा आवाज जायदॅ ऑड्या जॉराय आड्डॉन दोनी हाथाव डॉनॉ करॉन पेद्रु बोयलॉ, ‘फादर SSS तुमी साल्ले पन तॅआ फिल्या शेटश्या बंगलीआ बेजीमात करेसा हाय तुमाला आज.. आन आमश्या फादरनॅ तॅ फिल्या शेटला हांगॉन पन ठवीलॅ, जॅ तॅआ बंगल्याआ बेजीमात तुमी करदया भगून. आतॅ फिल्या शेटला का जबाब द्यासॉ मॅ, तॉ तडे वाट बगीत बॅहलॅ हायदॅ.’
आतॅ मात्र फादर थांबलॉ आन मांगी वळालॉ. पेद्रुआ मॅरॅ आलॉ, लामनॅस पेद्रुला हांगातॅ, ‘या दॉँगा पेंडा पेंडीत जॉ जीकॅदॅ तॅला फिल्या शेटश्या घारा बेजीमात कऱ्या धाड. ऑडा बॉलॉन फा. बुर्गेंझानॅ सायकलला जा पायडल मारला ता तॉ उबी रॅदो थेट तॅआ पॅरिशला.

# डसकाळलॉ पानी तॅ

▪ सौ. हेडविजेस रूमाव, गास

माथ्योर हांडॉ पानॅय भरलॅ
वर बगीत साल्ले
लागली पायाला ठेप
मंग भिजला हांगातॅ
मनात विसार डसकाळातॅ
सैरभैर कापरी भरातॅ
झाडाई फांदी वारॅय हालातॅ
पाने फुले खाला पडातॅत
समुद्रा लाटयो वरखाला हॉतॅत
खोल समुद्रात का सल्ले
आयुशात ऑबडॅ कश्ट कॅलॅ
आंगोर सुकदुक झॅललॅ
संवसाराआ जंगलात आख्याये
वायल्या वायल्या झाडोर घरटे
पनू वाऱ्या लहरीत
ॲकमॅकां बरबर हात
मायेशे बोल्ने अहले
यॉस उबदार स्पर्श सल्ले.

# लाद्रू पेद्रु

▪ **सिरील मिनेझिस, आगाशी**

**लाद्रू** : का रॅ पेद्रुआ ? आज तुओ बड्डे. आज जिव्यासॉ का बेत हाय ?
**पेद्रु** : स्पेशल बेत हाय.
**लाद्रू** : माला हांग गनी, मॅ मांगॅसॉ नाय.
**पेद्रु** : तुला बन कॅलॅआ रॅ ! लाद्रूआ, आज मॅ लहनाई भाजी केले..
**लाद्रू** : का बॉलाता ? तुआ दरी बो नोटयो हात रॅ. पन मॅ का हांगातॅ, आपुन मट्नात भरीला बटाट टाकीत्यात ताहा तु लहना भाजीत कय टाकीलॅ गा नाय ?
**पेद्रु** : टाकीला नाय काहा ? मॉजॉन सव्वाशे ग्राम बकऱ्या मटन टाकीलॅ.
**लाद्रू** : ओ माज्या दॅवा ! तु आयकॅसॉ नाय. बरा पन भाजीत तांबोटा-बिंबोटा टाकीलॅ गा नाय ?
**पेद्रु** : आज टाकीलॅ.
**लाद्रू** : मिंजॅ ऑडॅ दी टाकीत नॉतॉ गा का..?
**पेद्रु** : टाकीतोतॉ रॅ.. पन कापॉन नाय, आख्खाशा आख्खा टाकीतोतॉ.
**लाद्रू** : माआ कय धॅनात आला नाय.
**पेद्रु** : मॅ जीवनात आख्खा तांबोटा टाकॅसॉ आन जिवान जाला गा ता तांबोटा काडॉन माकून फ्रीज मीनॅ ठवॅसॉ.
**लाद्रू** : अच्छा, मीनजॅ आज तास तांबोटा तू कापॉन जीवन्यात टाकीला.
**पेद्रु** : तुला खरा हांगॉ गा, शार दी जालॅ ता तांबोटा मॅ जीवन्यात टाकितॅ. आज पन काडॉन ठोयोतारॅ, पन जाला का, तांबोटा विताळला रॅ.
**लाद्रू** : तांबोट्या नशीब, बी का ? बरा मसालॉ-बिसालॉ टाकीटा गा नाय तू ?
**पेद्रु** : ऑडॅ दी टाकीत नॉतॉ पन आज पळीभर टाकीलॅ.
**लाद्रू** : वा ! मंग खायदा का..
**पेद्रु** : खासा का ? आमश्या इये बोल्ने खा लागॅत माला.
**लाद्रू** : क रॅ ?
**पेद्रु** : आमशी इये सुलीओर जिवान बनवितॅ पन आज मॅ गॅस वर कॅलॅ.
**लाद्रू** : वाये ! मंग तूआ कय खरा नाय. लवकर घारा जाय आन मॉडकॉ मारॉन, ठाव-बिव सॉळॉन ठो.
**पेद्रु** : ताहास करतॅ. तू येता जिव्या दो ?
**लाद्रू** : नाका रे, मागशा टायमाला आहास जिव्या बोलविला आन जीविल्योर ठाव सॉळ्या लावीलॅ तू. मॅ या नाय आन तुई लहनाई भाजी पन खा नाय. आरे हो पन तू हांगीला नाय ता ? पाव किलो लहनाई भाजी केले गा अरद्या किलोइ..
**पेद्रु** : कुनाला बॉल नाका. आमशी इ गेले नाशिकला गपचूप तीआ कबाड उगड्ला आन शार-पास पाकळ्यो मॅ टोरकाविल्यो. त्याईस भाजी केले.
**लाद्रू** : शा मारी तुला “लहन्या” कादो हांगात्यात ता आज माला कळला रॅ.

## **लाडकी बेन** – शकुंतला नारायण पाटील, नवाळे

लाडक्या बेनीनॅ तॅ तरलॅ
गर्वानॅ कय हरले
तॅइ आपल्याला गृहीत धरले
मान गॅलॉ, दी भरलॅ
इंजान आतॅ, धडधड करतॅ
मशाल पेट्रोल जास्ती भरतॅ
गळो कापीत राश्ट्राअॅ वादी
कॉडॅ वाटीलॅ, करतॅत यादी
कादो लागल्या यां नादी
आपली मीठ भाकर खाशी सादी
वादी घालतॅत गळॅत गळॅ
फुलातॅत तॅअॅ ऊहाशॅ मळॅ
आपल्याला इ कय नाय कंळॅ



# उठवॅ नाय

– आब्राहाम तुस्कानो, घॉटखाल, नंदाखाल

**शिजू** – उठवॅ नाय माला बॅहवॅ नाय
माथॅशी गव माला काडवॅ नाय.
दॅवा रे बोरिंगसॉ पानी माला भरवॅ नाय.
**दुमा** - उठवॅ नाय तुला बॅहवॅ नाय
माथॅशी गव तुला काडवॅ नाय.
तुला लो भुजलॉ पापड तुला मॉडवॅ नाय.
**शिजू** – लाती मारता तु मूकॅ मारता
बायका माहनाय तु ठॉशॅ मारता
तुआ रॅ हाताअॅ कुडकॅ कतॅ हॉयदॅत रॅ
**दुमा** - खॉलॅ बगॉन मॅ मंबय जातॅ
दंडुबोंडे विकॉन पैशॅ हाडतॅ
औदासा माआ मुंडोर तु बॅहॉन खाता
**शिजू** – खपॉन धपॉन माआ घर भरला
टुकॉन वाडवॉन माला वाडविला
आरॅ तू मावलीला गॉड कतॅ हॉयदा रॅ
**दुमा** - दॅवळा जाता तू रावळा जाता
मावलीला गॉड माला कादो करता
तूआ लो माथॅव गॉटॉ मॅ करतॅ लो
**शिजू** –ताडी पेता तू दारू पेता
हांज हाकाळ तू फूगॉन येता
आरॅ तू दारू पॅऑन तू पीकलॅआ रॅ आज
**दुमा** - वेनी करता तू फनी करता
आख्खॉ दी तू नुसती मिरवाता
आला तू साऊळ खाऑन तू फुगलॅ लो

# लेकीआ प्रेम

– बबन रॉड्रिग्ज (बबन गुरुजी)
पहराव, नंदाखाल

आय मॅलॅला वहरे जाले तीन
तिगाळपासून हाल हॉतॅत बाबाशॅ माज्या
आय बाबासॉ लाडकॉ ना पूत
आख्खॉ दी पॅऑन तॅला मीळॅ नाय सुद
बाबाला नाय हारका खादो गा प्यादो
फाटलेली सादर दिले तॅला नीजॅदो
वॅळासॉ वेळ काडॉन मायारा मॅ जातॅ
बाबाशॅ हाल बगॉन, जीव खालावर हॉतॅ
आंगाबुडसा कथान मॅ जाऑन धवॅशी
शा करॉन तॅला मॅ हळूहळू पाजॅशी
बाबाशा घारा जाले सगळी डांबाडोळ
मॅ जाऑन करॅशी बाबाशी आंघोळ
इ सगळा करता करता बाबा माला बॉलातॅ
ॲकलॉ परमिसर तूआस लो बरा करदॅ
बाबासॉ आसिर्वाद फुकाट नाय ना गॅलॉ
तिहऱ्या दिहा बॉठॉ पॉर कामाला लागलॉ.

# पय आन पेनल

– **विलास मेदोडीकर**

आदी आपले जुने घरे तॅत आंगळॅत खळा आन मिंगारा आस्वानाआ तळा (बाइओर ठाय आन अॅखाद वॅळा कथान आंगोळ केल्योर वाऑन जानारॉ पानी) तळा.. गटार..
तॅत बाडूक आन बाड्क्यो.. अॅखाद वेळ दिवाड नायतॅ भय-दिवाड
दापुडॅ खळॅला हॅनाआ हारवान
मंग तॅतनॅ रुजॉन यॅनारा ऑलात.. त्योर एन्द्रो आन हुई काडी...
इ आमशी बालपनीशी जुरासिक जीवसुष्टी... एनिमल प्लेनेट आन डिस्कवरी चॅनेल..

पाहाळॅत ओट्योर माह्यो पकडॉन तॅतॅय पाखे तॉडॉन पाळीव प्रानी (पेट अॅनिमल) करॅशे इ ओडी बालबुद्दी आन समज.. प्रीस्कूल.. एप्टीटुड...
वय सादारन शार पास वहरे
धोकादायक प्रानी का हायदॅ ..? काळॉ मुगलॉ.
पायाशा बॉटाआ बॅशॅत सावीलॉ मिंजॅ रगात निंगालास समजा.
मंग बाय हांगॅशी ‘मुगले मुंडले नासलो..
दॉपार तिपार बॉठॅ बयश्या वॅंगॅत बेहेले गा, तीआ गळॅशे खुरुस आन पय हॅवाय थंडे लागॅशे. तॅइ माइती बय हांग्याशी.
... इ ना...! इ गा .... ?
पय ना वांद्ऱ्या गेलती तडशी.. आन खुरुस तूआ बाबानॅ हाडलॉतॉ.. मंबय युखरिस्ट कांग्रेस भारलोती. तडे बायरश्यो शिश्टरी वाटीतोत्यो... तडसॉ.
मंग आमे विसऱ्याशे.. ‘बो ! सांदीऑ गा ..?
आन रुजार होती दुर्मिळ वस्तु.... तिगाळशी कानी.
....

देव आन परमिसर.. माय आन मावली..
यो कल्पना रुजॅश्यो.. नर्सरी बागेत..
मंग पूडॅ वाडत्या वयाला आकार घॅता घॅता.. शानपान आन वाडी शानपान यासा.
तॅ वीर आन परमवीर. हड्डे आन दिवडे मारनारे बेअर ग्रील्स आन घारा आल्ये गा आयो बयो ओट्योरश्या मिनारीओरश्या आहरॅत हात करॉन न्यायासॉ तराजू दाखडॉन पापाइ भीती आन पश्चातापाइ गरज कॉमसारा वय हॉअॅशा आदीस धडॉ-धॉरॉन द्याशे.

पेनल आतदारा आन मिराशी मिंजॅ आहरॅ ओट्योरशा मिनारीओर
पेनल जकलॅस घारा नॅाता... नहॅसा.
आहारॅ दॅवाशॅ आन सॉर्गात गॅलॅल्या वडलाॲ आन वराडॉन गॅलॅल्या लेकी बायश्या जॉडॅॲ.
... जुने घरे सामाईक. सक्क्या आन सक्क्या-चुलत भावकी एकवट वर्गा-वर्गात गयी-पडगयी काडीत. मुख्य उत्तर पत्रिकेला पुरवनी जोडतॅत तही. खुट-वाड काडीत.. नांदात..

तॅ माळी, शेतकरी आन गवळी. पॅँडॉ पावळी. कोंबडॅये हळाम्बे (कपीरॅ)...
.....

वर्गा वर्गाये मीटर लायटीये. आन तहेस आहरॅ परतेकाॲ भाग-विभाग वाटलॅआ घतीन जागोजाग टांगलॅलॅ.
पन पेनल सामाइक हॉता. तेस करताना मंग कून नवसाइ वात लावॅसा. मंग तॅआ हेतुंना बोम्ब-डोम्ब आन खयताळॉ न घाल्ता जानतॅ वडिलजन हात जोडीत.
पेनल शिसवी नातॅ हागली लाकुडाआ. तीन मिनारी. मीनश्या मिनारीओर खुरुस आन तीन जुरूक उच्छिला घनी..
बरॅत अहल्या बॉठॅ घाराआ पेनल काशी लावीलॅला. मेनवातीला पितळीऑ श्टॅन्ड.
आमशी काकय.. शाळीआ तॉँड ना देखीला पन मावलीइ लिटानीया आन वारापरमानॅ रहस्ये, मरियेइ विनंतीमाला तॉँडपाट बॉलॅशी, तॅ कॉडा नवाल आन कवतुक..
मंग गायन... कंतार.
उपासकाळात दुखाॲ गानॅ... मावलीऑ गीत.
कॅरिजमॅटीक (पवित्र आत्माठाइ नवजीवन) सुरू हॉॲसा हॉता तिगाळशी वेळ..
....
जुने गेले जून्या लागून... नवे आले चुन्या लागून..
पयी बयीश्यो आन पेनल बापासा धन.
पोरे पारे फुले पाने जमवॉन हार माळी करॅशे. मावलीऑ हन, संज्यावसॉ हन.
नाताळसॉ गॉठॉ... ‘सादगी मे कयामत की अदा’ आहा बॉल्ना हाय.
उपास काळात काळोखात घारा पोसले गा पायरीओर मॅनवाती.. दिवाळीला तॅलवाती.. फटाकॅइ आतशबाजी बगॅदो पायऱ्यो. मिंजॅ पॉरांपारांव स्टेडीयम श्टॅन्ड..
पय होती पेनल हॉता... वॅड्या वांगड्या लॉकांआ भॉळ्या समजुतीत अलौकिक विश्वासापेक्शा बावनकाशी श्रद्धा सॉर्गाइ वीजा होती. आन ती पन इजरायल हज उमरह न करतासुदा.

# गाव – घराला घरपान

- **आलेस डाबरे, निर्मळ**

घराऑ कारभारी शाळीत गॅलॉ नॉतॉ, तरी तॉ दिलदार हॉतॉ
अडीअडसनीला धाऑन, जकल्या उपेगी पडातोतॉ
ॲकमॅकां घारा जात येत हॉतॉ
सुकदुखात नवटाक पावशेर मारतोतॉ
दी माळता सब्बान गावकरी ॲका जागी भॅटॅशॅ
तिगाळा गावाला गावपन हॉता.

कौला घराला कारवी कुडायो भिती
नोत्यो खोल्यो पन घर पॉरांबाळाय भरलॅला
आंगाळ ऑटॉ भॉठॉ, त्योर कूटूमाई बैठक
दिहा भरायो वार्ता होतोत्यो, घराला घरपन हॉता

गॉठॅत गाई भई होत्यो
गाई हारक्यो मायाळू माय होत्यो
ऑबाय तीआ पुडॅ बकरी, नवरॉ तिगाळा बैल नॉतॉ
वडीलधाऱ्यांना मान, तॅँआ सब्दाला किमत होती

शारानॅ – आठानॅव व्यवार हॉतॉ
संवसार सलातोतॉ, काडीमोडसा नाव पन नॉता

गावकरी हाकाभोटे लवकर उठात
शा बटर-पाव खाऑन, ऊबी रॅआ भाटात
ओनव्याय पाळ दांडपाळ करीत, तांब्यामिनशी कनेरी पेत
बांदॅसूद आंग, पॉटाइ ढेरी नोती
तिगाळा योग, जिम तॅला माइत नोती

दॉपारसा जिव्या रात्या धान वर बुंबला कालवान
मुंडयात सॉ आंबॉ नातॅ भुजलॅलॉ पापड तॉँडा
रांबलॅल्या कोलूमा बरबर पांडो कांदॉ
पन आदी नवटाक-पावशेराऑ डोस

भुयोर बॅहॉन केळीआ खोल्योर पॉटभर जिवीत
भर दॉपारात भाटात जाऑन आयमेरीला घारा येत
आल्तारा रजार कुटुंमात करेशे
यात ते गुतले भगून ते मस्त रेले

चायनीज तंदुरी सब्द माइत नॉतॉ

धापटी पाल्गॉ ऑस मेन मेन्यू हॉतॉ
पालग्यानॅ घसॉ ऑरपॉन कफ नीगॉन जासॉ
धापटीआ दड्ड्याला शा ढकलॅसॉ
पॉट भरोन पडल्या जागी नीजॅसॉ
तिगाळा लोक निरोगी होते, नीजॅइ गोळी घेत नोते.
हाकोटश्या टॉलॅला ऊठॉन देवळायो पायर्यो सडात
पास सा पयला मिस्सा आयकॉन कामाला सुरवात करीत
तिगाळा गावाला गावपान आन घराला घरपन हॉता

आतॅ पावले जरी लाम गेले तरी
जुन्यो आठोनी मनात रेल्यो हात ना
त्या काळात गावात एक माय होती
आन लॅकराइ मायेला उबदार साथ होती
आतॅ आय नाका आनु उबदार माय नाका
डॅड मॉम आन एक बेबी बाबू
त्रिकोन चौकोन पुर्न विराम

# कल्पतरू ग्रामीण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित, भुईगाव

नोंदणी क्र.: टी.एन.ए./(व्हि.एस.आय.) आर.एस.आर. (सी. आर)/७२८/९५-९६

''डिस्क्वेअर'', नवाळे नाका, भुईगाव, ता.पो. वसई, जि. पालघर - ४०१ २०१
शाखा : मर्देस वाघोली. (वाघोली सह. डेअरी)

## १५०कोटीच्या व्यवसायाकडे वाटचाल

### ३० सप्टेंबर २०२४ अखेर पतसंस्थेची सांपत्तिक स्थिती.

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| **ठेवीवरील व्याजदर** | : | कालावधी | सर्वसाधारण | | ज्येष्ठ नागरीक |
| | | १५ महिने | ७.४०% | | ७.६५ % |
| | | १९ महिने | ७.३०% | | ७.५५% |
| **ठेवी** | : | रु. ५७.३३ कोटी | **गुंतवणूक** | : | रु. ३६.४५ कोटी |
| **निधी** | : | रु. ९.६८ कोटी | **कर्जे** | : | रु. २८.२९ कोटी |
| **भांडवल** | : | रू. १.७५ कोटी | **निव्वळ NPA** | : | ० % |
| **कर्जावरील व्याजदर** | : | तारणी कर्ज १० % | नवीन घरबांधणी कर्ज ९.२५% | | |

**बिनतारणी कर्ज रु. ३००००० पर्यंत ११.९५% या कमी केलेल्या व्याजदरात त्वरीत मिळण्याची व्यवस्था.**

**१ सप्टेंबर २०२४पासून "कल्पतरू शैक्षणिक कर्ज'' माफक व्याज दरात उपलब्ध**
**या कर्जात "कल्पतरू लाडकी लेक शैक्षणिक कर्ज'' अधिक सवलतीच्या व्याज दरात उपलब्ध.**

**तारणी कर्ज मर्यादा रु. ७५ लाखापर्यंत** (ठोस उत्पन्नाच्या आधारावर)
**बिनतारणी कर्ज मर्यादा रु. ५ लाखापर्यंत** (ठोस उत्पन्नाच्या आधारावर)

**जलद कर्ज मंजूरी प्रक्रिया**

**ठेवीवर आकर्षक व्याज दर**

**आपल्या ठेवीच्या संपूर्ण सुरक्षिततेची हमी**

**शाखा**

**भुईगाव : MOB. : 8788912251**
**वाघोली : MOB. : 9561960989**

**बॉबी डाबरे** — व्यवस्थापिका
**डेव्हिड तुस्कानो** — मा. सचिव
**आशा डाबरे** — उपाध्यक्षा
**मॅन्युअल डायस** — अध्यक्ष

**व संचालक मंडळ**